गुरुवार दि. १५ ऑक्टोबर २०२६ ● जालना ● वर्ष ८ वे ● अंक ४३ वा ● किंमत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल ॲण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एका छताखाली आरोग्य सेवा
डॉ. आनंद माने Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com
# युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

जालना जिल्ह्यात गाव दत्तक अभियान

## टंचाईग्रस्त गावांना मिळणार दिलासा -जिल्हाधिकारी आशिमा मित्तल

**जालना - प्रतिनिधी**

जिल्ह्यातील दुष्काळ परिस्थिती, वाढते तापमान, आटलेले जलाशय आणि करपलेली पिके अशा दुष्काळी संकटाच्या छायेत असलेल्या जालना जिल्ह्यातील टंचाईग्रस्त गावांना दुष्काळाच्या झळांमधून बाहेर काढून दिलासा देण्यासाठी 'गाव दत्तक अभियान' च्या माध्यमातून सर्वोतोपरी मदत करण्याचा प्रयत्न करणार असल्याचे जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी सांगितले. जिल्हाधिकारी कार्यालयातील प्रगती सभागृहात जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या संकल्पनेतून लोकसहभागाला प्राधान्य देत सामाजिक दायित्वाचा नवा आदर्श निर्माण करणारा गाव दत्तक अभियान या अभिनव उपक्रमाच्या बैठकीत श्रीमती मित्तल बोलत होत्या. यावेळी जिपचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कृष्ण कांत कनवारीया, अप्पर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ, निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल, उपजिल्हाधिकारी मनिषा दांडगे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. राजेंद्र पाटील यांच्यासह जिल्ह्यातील उद्योजक, व्यापारी महासंघ, सामाजिक संस्था, विविध संघटनातील मान्यवर उपस्थित होते.




यावेळी श्रीमती मित्तल म्हणाल्या की, लोकसहभागाच्या माध्यमातून सामाजिक दायित्वाची भावना कृतीत उतरवून समाजहिताचा नवा आदर्श निर्माण करणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. जिल्ह्यातील दुष्काळग्रस्त आणि अतिसंवेदनशील गावांमधील नागरिकांना मदत मिळवून देण्यासाठी तसेच मदत करू इच्छिणाऱ्या व्यक्ती, उद्योजक, स्वयंसेवी संस्था आणि सामाजिक संस्थांना गरजूंशी थेट जोडण्यासाठी त्रिस्तरीय सूत्रावर आधारित हे अभियान राबविण्यात येणार आहे. या अभियानात जिल्हा प्रशासन मुख्य सुविधादाता म्हणून काम करणार असून, हेल्पलाइन, संस्थांचा सहभाग आणि नागरिकांचे योगदान या तीन प्रमुख स्तंभांवर अभियानाची अंमलबजावणी केली जाणार आहे. अभियानाच्या पहिल्या टप्प्यात जिल्ह्यातील सर्व आठ ही तालुक्यांसाठी स्वतंत्र हेल्पलाइन क्रमांक जाहीर करण्यात आले आहेत. या हेल्पलाइनच्या माध्यमातून मदतीची गरज असलेल्या नागरिकांची तसेच मदत करण्यास इच्छुक व्यक्ती व संस्थांची नोंदणी केली जाणार आहे. पाणी, जनावरांसाठी चारा, रोजगार, शैक्षणिक मदत, आरोग्यसेवा आणि कर्ज यांसारख्या गरजांसाठी नागरिकांना मदत मागता येईल. त्याचबरोबर आर्थिक मदत, आवश्यक साहित्य किंवा कुटुंब व गाव दत्तक घेण्याची इच्छा असलेल्यांनाही या यंत्रणेद्वारे सहभागी होता येणार आहे. यामुळे गरजूंना योग्य मदतदारांशी जोडण्याची प्रक्रिया सुलभ होणार *(पान २ वर)*

पायाला फ्रॅक्चर; शेतकऱ्यांसाठीची धडपड मात्र थांबली नाही!

## व्हीलचेअरवर मंत्रालयात पोहोचलेल्या अर्जुन खोतकरांच्या पाठपुराव्याला यश; १८ गावांतील दीड हजार शेतकरी कुटुंबांच्या कर्जमुक्तीचा निर्णय

**जालना - प्रतिनिधी**

वर्षानुवर्षे डोक्यावर कर्जाचा बोजा, तारणात अडकलेल्या जमिनी आणि नव्या कर्जासाठी बंद झालेले बँकांचे दरवाजे रामनगर येथील युनियन कृषक सेवा सहकारी संस्थेशी संबंधित १८ गावांतील सुमारे १,५०० शेतकरी कुटुंबांना या आर्थिक कोंडीतून बाहेर काढण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय आज मंत्रालयात झाला. आमदार अर्जुन खोतकर यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत सुमारे ₹२२ कोटींचा दीर्घमुदतीचा कर्जप्रश्न



₹२.५ कोटींच्या एकरकमी तडजोडीतून (ओटीएस) निकाली काढण्याचा निर्णय घेण्यात आला. तडजोडीची ही रक्कम शासन भरणार असल्याने संबंधित शेतकऱ्यांवर आर्थिक भार पडणार नाही. या शेतकऱ्यांच्या कर्जप्रकरणाचा *छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान कर्जमाफी योजनेत समावेश करून त्यांना कर्जमाफीचा लाभ मिळवून देण्यासाठी आमदार अर्जुन खोतकर यांनी सातत्याने प्रयत्न व पाठपुरावा केला आहे.*

अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला प्रश्न सोडवण्यासाठी त्यांनी शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती, तारणात अडकलेल्या जमिनी आणि नव्या कर्जासाठी येणाऱ्या अडचणी शासन व बँकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसमोर मांडल्या. _या बैठकीतील खोतकरांची उपस्थिती त्यांच्या शेतकऱ्यांप्रती असलेल्या संवेदनशीलतेची साक्ष देणारी ठरली. अपघातात पायाला फ्रॅक्चर झाल्याने डॉक्टरांनी त्यांना एक ते दीड महिना सक्तीच्या विश्रांतीचा सल्ला दिला होता. तरीही अवघ्या आठ दिवसांत स्वतःच्या वेदना सोसत ते शेतकऱ्यांचा प्रश्न सोडवण्यासाठी व्हीलचेअरवरून मंत्रालयात पोहोचले._ आपल्या प्रकृतीच्या अडचणींपेक्षा दीड हजार *(पान २ वर)*

## परतूर नगरपालिकेत टक्केवारीचा महाभ्रष्टाचार चव्हाट्यावर: माजी उपनगराध्यक्ष मोहन अग्रवाल यांचा संताप अनावर; पालिकेत थेट २ लाख रुपये उधळले !

लेखापरीक्षक रघुराज चव्हाण यांच्यावर १०% लाच मागितल्याचा थेट व खळबळजनक आरोप

**परतूर - प्रतिनिधी**

परतूर नगरपालिकेत सुरू असलेला अनागोंदी कारभार, उघड टक्केवारी आणि अधिकाऱ्यांची लाचखोरी याविरोधात आज एका अभूतपूर्व आंदोलनाने संपूर्ण शहर हादरून गेले आह. नगरपालिकेतील भ्रष्ट यंत्रणेला चपराक लगावण्यासाठी शिवसेना शिंदे गटाचे नेते तथा माजी उपनगराध्यक्ष मोहन अग्रवाल यांनी थेट नगरपालिकेत जाऊन रोख २ लाख रुपये उधळत संतापाचा स्फोट घडवून आणल. पालिकेचे लेखापरीक्षक रघुराज चव्हाण यांच्या मनमानी कारभाराला आणि उघडपणे मागितल्या जाणाऱ्या १० टक्के कमिशनच्या जाचाला कंटाळून हे पाऊल उचलल्याचे अग्रवाल यांनी स्पष्ट केले असून, या घटनेमुळे पालिका वर्तुळात प्रचंड खळबळ उडाली आहे.

प्राप्त माहितीनुसार, परतूर नगरपालिकेमार्फत शहरात विविध विकासकामे करण्यात आली आहेत. या कामांचे बांधकाम अहवाल, तपासणी अहवाल आणि सर्व अधिकृत प्रक्रिया पूर्ण होऊन सर्व फाईल्स नियमानुसार ओके (मंजूर) झालेल्या आहे. तरीही, संबंधित लेखापरीक्षक कार्यालयात या फाईल्स गेल्या



६-६ महिन्यांपासून जाणीवपूर्वक प्रलंबित ठेवण्यात आल्या आहे. कंत्राटदार, व्यावसायिक आणि संबंधितांच्या हक्काच्या अनामत रकमा (सिक्युरिटी डिपॉझिट) तब्बल २० ते ५० हजार रुपयांपासून लाखो रुपयांचे बिलं थकवून ठेवण्यात आल्या आहेत. अनामत रक्कम परत मिळवण्यासाठी संबंधितांना कार्यालयाचे उंबरठे झिजवावे लागत असून, ''जोपर्यंत १० टक्के कमिशन मिळत नाही, तोपर्यंत सही होणार नाही,'' अशी उघड भूमिका लेखापरीक्षक रघुराज चव्हाण यांनी घेतल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. एकीकडे *(पान २ वर)*

## कास्ट्राईबचे ४६ वे राज्यस्तरीय अधिवेशन दि. १९ ला नागपुरात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उद्घाटन

**जालना । प्रतिनिधी**

कास्ट्राईब कर्मचारी महासंघ, महाराष्ट्र राज्याच्या वतीने ४६ वे राज्यस्तरीय अधिवेशन सोमवार, दिनांक १९ ऑक्टोबर २०२६ रोजी नागपूर येथील कुसुमताई वानखेडे भवन, उत्तर अंबाझरी रोड येथे आयोजित करण्यात आले आहे. या अधिवेशनाचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते होणार असून, शिक्षणमंत्री दादाजी भुसे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहणार आहेत. महासंघाचे राज्याध्यक्ष कृष्णा इंगळे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असतील.

या अधिवेशनात राज्यातील कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित प्रश्नांवर चर्चा करून महत्त्वपूर्ण ठराव मंजूर करण्यात येणार आहेत. पदोन्नतीतील आरक्षण, आरक्षणाचा अनुशेष, जुनी पेन्शन योजना, वेतनातील त्रुटी आणि कर्मचाऱ्यांच्या अन्य प्रलंबित मागण्यांबाबत शासनाचे लक्ष वेधण्यात येणार आहे. या प्रश्नांवर शासनाकडे मागण्यांचे निवेदन सादर करण्यात येणार असल्याने अधिवेशनाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. अधिवेशनाच्या यशस्वितेसाठी जालना जिल्ह्यांमधील कास्ट्राईब कर्मचारी महासंघाचे पदाधिकारी, सभासद आणि कर्मचाऱ्यांनी हजारोंच्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन महासंघाच्या वतीने करण्यात आले आहे. याबाबतची माहिती *महासंघाचे जिल्हाध्यक्ष विनोद भगत**यांनी दिली. यावेळी महासंघाचे श्रीकृष्ण बकाल, प्रदीप मघाडे, गोविंद इंगळे,ओबेद कुरेशी, नितीन श्रीमंगले,संजू वानखेडे, राजू पवार, अनिल एडके, नरेंद्र जोशी, अविनाश दांडगे, राहुल लालझरे, रामेश्वर जावळे, भगवान तायड, गजू मगर, करण गव्हाड, अरुण खोजे, श्रीमती सरोज बिडला, रामेश्वर कुबेर, आनंद रायते *(पान २ वर)*

## शेतकऱ्यांच्या खात्यात दिवाळी पूर्वी पाच हजार रुपये जमा करणार – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

परीक्षा शुल्क सरसकट माफ होणार, पिण्याचे पाणी, चाऱ्याची उपलब्धतेबाबत नियोजन; शेतकऱ्यांकडून वसूली नको; बँकांना निर्देश

**मुंबई - प्रतिनिधी**

राज्यातील आणखी चाळीस तालुके दुष्काळी म्हणून जाहीर करतानाच, या गंभीर परिस्थितीत शेतकऱ्यांना आगामी दिवाळीच्या तोंडावर दिलासा म्हणून त्यांच्या खात्यावर पाच हजार रुपयांचा अग्रीम जमा करण्याचा निर्णय घेतल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे सांगितले. सह्याद्री राज्य अतिथीगृह येथे राज्य मंत्रिमंडळाची बैठक झाल्यानंतर मुख्यमंत्री फडणवीस माध्यम प्रतिनिधींशी बोलत होते. शेतकऱ्यांकडून कर्ज वसुलीसाठी कुठल्याही प्रकारचा तगादा लावण्यात येऊ नये, अशी सक्ती ताकीद संबंधित सोसायट्यांपासून, जिल्हा बँका, राष्ट्रीयकृत बँका आणि मायक्रो फायनान्स कंपन्यांना दिल्याचेही मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले. पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे यासाठी पाण्याच्या अवैध उपश्यावर कठोर कारवाईचे निर्देश दिल्याचे आणि त्यासाठी सोळा हजार वीज जोडण्या तोडण्यात आल्याची माहिती मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी दिली. राज्यात यापुर्वीच २६५



तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे. त्यामध्ये आता आणखी ४० तालुक्यांचा समावेश करण्यात येत आहे. आता दुष्काळी तालुक्यांची संख्या ३०५ इतकी झाली आहे. या तालुक्यांमध्ये आता दुष्काळी उपाय योजना करण्यास प्राधन्य देण्यात येणार आहे. यापूर्वीच्या समाविष्ट तालुक्यांध्ये दुष्काकाळाबाबत ट्रिगर एक लागू केला होता. आता नव्याने समाविष्ट तालुक्यांसह, या तालुक्यांमध्ये ट्रिगर लागू करण्याबाबतची कार्यवाहीला गती देण्यात येत आहे. दुष्काळी तालुक्यातील विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क कोणतेही निकष न लावता सरसकट माफ करण्याचे निर्देश देण्यात आल्याचेही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी एका प्रश्नावर स्पष्ट केले. जनावरांसाठी चारा उपलब्ध व्हावा यासाठी मंत्रिमंडळ बैठकीत उपाययोजनांची चर्चा करण्यात आली. तसेच चाऱ्याच्या उपलब्धतेबाबत सर्वंकष आढावा घेण्यात आला. जिथे पाणी आहे, तिथे चाऱ्यांसाठीच्या पिकांची लागवड करण्यात यावी. तसेच रब्बीमध्येही ज्वारीसारख्या चारा देणारी पिके घेण्यासाठी प्रयत्न व्हावेत, अशी सूचना करण्यात आली आहे. जनावरांसाठी चारा उपलब्ध *(पान २ वर)*

## मंठा चौफुली ते न्हावा रस्त्याच्या दुरुस्तीला वेग; खड्डे तातडीने बुजविण्याचे जिल्हाधिकाऱ्यांचे निर्देश!

जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांची प्रत्यक्ष पाहणी; दर्जेदार काम विहित वेळेत पूर्ण करण्याचे संबंधित विभागाला आदेश

**जालना - प्रतिनिधी**

मंठा चौफुली ते न्हावा या रस्त्यावर ठिकठिकाणी मोठ्या प्रमाणावर खड्डे पडल्याने वाहनधारकांना प्रवासादरम्यान मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. या रस्त्याच्या दुरवस्थेबाबत नागरिकांकडून तक्रारी प्राप्त झाल्यानंतर जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी प्रत्यक्ष घटनास्थळी जाऊन रस्त्याची पाहणी केली. यावेळी रस्त्यावरील खड्डे तातडीने बुजवून दुरुस्तीचे काम युद्धपातळीवर सुरू करण्याचे निर्देश त्यांनी संबंधित विभागाला दिले.



मंठा चौफुली ते न्हावा हा मार्ग वाहनांच्या दळणवळणाच्या दृष्टीने महत्त्वाचा असून, रस्त्यावर ठिकठिकाणी खड्डे पडल्यामुळे वाहनचालकांना वाहन चालविताना कसरत करावी लागत आहे. खड्ड्यांमुळे प्रवासाचा वेळ वाढण्यासोबतच वाहनांचे नुकसान होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. विशेषतः दुचाकीस्वारांना या रस्त्यावरून प्रवास करताना अधिक काळजी घ्यावी लागत असून, अपघातांचा धोकाही वाढण्याची भीती व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी मित्तल यांनी रस्त्याच्या प्रत्यक्ष स्थितीची पाहणी करून संबंधित यंत्रणेला तातडीने कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या.

पाहणीदरम्यान रस्त्यावर विविध ठिकाणी खड्डे पडल्याचे निदर्शनास आले. नागरिकांची सुरक्षितता आणि वाहतूक सुरळीत ठेवण्याच्या दृष्टीने रस्त्याची तातडीने दुरुस्ती करणे आवश्यक असल्याचे लक्षात घेऊन जिल्हाधिकाऱ्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना कामाला वेग देण्याचे निर्देश दिले. खड्डे बुजविण्याचे काम प्राधान्याने हाती घेऊन दुरुस्तीची प्रक्रिया युद्धपातळीवर राबवावी, असे त्यांनी स्पष्ट केले.

केवळ तात्पुरती मलमपट्टी न करता दुरुस्तीचे काम दर्जेदार पद्धतीने करण्यात यावे, तसेच निर्धारित कालमर्यादेत काम पूर्ण करण्यावर भर द्यावा, अशा सूचनाही त्यांनी दिल्या. रस्त्याच्या दुरुस्तीमध्ये गुणवत्तेची काळजी घेऊन नागरिकांना सुरक्षित आणि सुरळीत प्रवासाची सुविधा उपलब्ध करून देणे आवश्यक असल्याचे या पाहणीच्या माध्यमातून अधोरेखित झाले. जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या या पाहणीदरम्यान सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता श्री. कोल्हे, प्रादेशिक परिवहन अधिकारी श्री. दौंड, महानगरपालिकेचे अभियंता, पोलीस विभागाचे अधिकारी तसेच इतर संबंधित अधिकारी उपस्थित होते. रस्त्याच्या सद्यस्थितीची पाहणी करून आवश्यक दुरुस्तीची कामे तातडीने पूर्ण करण्याबाबत यावेळी निर्देश देण्यात आले.

दरम्यान, जिल्हाधिकाऱ्यांच्या पाहणीनंतर रस्त्याच्या दुरुस्तीच्या कामाला गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. मात्र *(पान २ वर)*

## अंबड येथे होणाऱ्या विधी व न्याय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती प्रसन्न वराळे

**अंबड - प्रतिनिधी**

मराठी साहित्याच्या माध्यमातून संविधान, कायदा आणि न्यायव्यवस्थेच्या संकल्पना सर्वसामान्यांपर्यंत सोप्या भाषेत पोहोचविण्याच्या उद्देशाने अंबड येथे येत्या ५ व ६ डिसेंबर २०२६रोजी दोन दिवसीय राज्यस्तरीय 'विधी व न्याय मराठी साहित्य संमेलना'चे आयोजन करण्यात आले आहे. या ऐतिहासिक संमेलनाच्या अध्यक्षपदी भारताच्या सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती प्रसन्न भालचंद्र वराळे यांची निवड करण्यात आली असल्याची माहिती यशवंत प्रतिष्ठानचे अध्यक्ष ॲड. संजय खोरे यांनी दिली.



महाराष्ट्र शासनाचा मराठी भाषा विभाग, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई आणि यशवंत प्रतिष्ठान, शेवगा, ता. अंबड यांच्या संयुक्त विद्यमाने हे अभिनव संमेलन आयोजित करण्यात येत आहे.यशवंत प्रतिष्ठानच्या माध्यमातून सामाजिक प्रबोधन, शिक्षण, पर्यावरण, कृषी आणि महिला सक्षमीकरण अशा विविध क्षेत्रांत कार्य केले जाते. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त मागील सोळा वर्षांपासून प्रतिष्ठानच्या वतीने नियमितपणे सामाजिक प्रबोधनपर 'यशवंत व्याख्यानमाले'चे आयोजन करण्यात येते. या व्याख्यानमालेत महाराष्ट्रासह देशभरातील अनेक नामवंत वक्त्यांनी आपले विचार मांडले आहेत.

'सुपर थर्टी'चे संस्थापक पद्मश्री आनंद कुमार यांच्या गौरवार्थ यशवंत प्रतिष्ठानतर्फे 'आनंद कुमार नॅशनल अवॉर्ड फॉर एज्युकेशन' हा पुरस्कार शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्ती आणि संस्थांना प्रदान केला जातो. तसेच समाजासाठी भरीव योगदान देणाऱ्या *(पान २ वर)*

# संपादकीय...

## घराघरांत काटकसरीचे आवाहन, मग व्यावसायिक पाणीवापराचा हिशेब कोण घेणार?

पाण्याचा प्रत्येक थेंब महत्त्वाचा आहे, हे संकटाच्या काळात सांगण्याची वेळ येते; मात्र पाण्याचे महत्त्व केवळ सर्वसामान्य नागरिकांनाच समजावून सांगायचे आणि व्यावसायिक पातळीवर होणाऱ्या पाणीवापराकडे दुर्लक्ष करायचे, अशी भूमिका प्रशासनाने घेतली तर पाणीबचतीच्या मोहिमेच्या विश्वासार्हतेवरच प्रश्नचिन्ह निर्माण होईल. जालना शहरात संभाव्य पाणीटंचाईची चिंता वाढत असताना महानगरपालिकेने अनधिकृत नळजोडण्या, पाणीचोरी आणि पाण्याचा अपव्यय रोखण्यासाठी दोन विशेष भरारी पथके नियुक्त केली आहेत. नागरिकांना नळांना तोट्या बसविण्यापासून ते वाहने धुण्यासाठी पाणी वाया न घालविण्यापर्यंत विविध सूचना दिल्या जात आहेत. ही पावले आवश्यकच आहेत. पण या मोहिमेत पाण्याचा मोठ्या प्रमाणावर व्यावसायिक वापर करणाऱ्या घटकांचा समावेश आहे का, हा अधिक महत्त्वाचा प्रश्न आहे. सर्वसामान्यांनी पाणी जपायचे, पण व्यावसायिक वापराचा हिशेब कोण घेणार? शहरात पाणीपुरवठा मर्यादित झाला, नळांना कमी दाबाने पाणी येऊ लागले किंवा नागरिकांना पर्यायी स्रोतांवर अवलंबून राहावे लागले, तर त्याची झळ सर्वप्रथम सामान्य कुटुंबांना बसते. पिणे, स्वयंपाक, स्वच्छता आणि दैनंदिन गरजांसाठी पाणी पुरविताना नागरिकांना काटकसर करावी लागते. अशा परिस्थितीत प्रशासनाने पाणीबचतीचे आवाहन करणे योग्य आहे. अनधिकृत नळजोडण्यांवर कारवाई करणे आणि जाणीवपूर्वक पाणी वाया घालविणाऱ्यांना रोखणेही तितकेच आवश्यक आहे. मात्र, पाणीटंचाईचे व्यवस्थापन करताना घरगुती वापरावरच लक्ष केंद्रित करून चालणार नाही. शहरातील पाण्याची मागणी किती आहे, कोणत्या क्षेत्रात किती पाणी वापरले जाते, कुठे गळती होते आणि कुठे पुनर्वापर शक्य आहे, याचा एकत्रित आढावा घेणे गरजेचे आहे. कारण पाण्याचा वापर केवळ घरांमध्ये होत नाही; अनेक व्यावसायिक प्रक्रियांमध्येही पाणी महत्त्वाचा घटक असते. मग पाणीबचतीचे नियम सर्वांसाठी समान आहेत का? की सर्वसामान्य नागरिकांच्या नळावरच प्रशासनाची नजर राहणार? पिण्याच्या पाण्याचे जार भरून विक्री करणाऱ्या केंद्रांमध्ये पाणी शुद्ध करण्यासाठी विविध तंत्रज्ञानाचा वापर केला जातो. काही ठिकाणी रिव्हर्स ऑस्मोसिस () प्रणाली वापरली जाते. या प्रक्रियेत शुद्ध पाण्यासोबत नाकारलेले पाणीही तयार होऊ शकते. त्याचे प्रमाण वापरलेल्या यंत्रणेवर, मूळ पाण्याच्या गुणवत्तेवर आणि देखभालीवर अवलंबून असते. येथे प्रश्न जार विक्रेत्यांचा व्यवसाय बंद करण्याचा किंवा प्रत्येक व्यावसायिक पाणी वाया घालवतो, असा आरोप करण्याचा नाही. प्रश्न आहे तो उपलब्ध पाण्याचा कार्यक्षम वापर होतो का, याची खातरजमा करण्याचा... एखाद्या केंद्रात किती पाणी वापरले जाते? त्यातून किती शुद्ध पाणी मिळते? उर्वरित पाणी थेट नाल्यात सोडले जाते की त्याचा पुनर्वापर केला जातो? पाण्याची बचत करणारी उपकरणे वापरली जातात का? अशा प्रश्नांची उत्तरे तपासणी आणि आकडेवारीतून समोर आली पाहिजेत. जार विक्री केंद्रांमधून नागरिकांना पिण्याचे पाणी उपलब्ध होते, ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे या व्यवसायाला अनावश्यक अडथळे निर्माण करणे हा उपाय नाही. उलट, पाण्याचा अपव्यय कमी करणारे तंत्रज्ञान, योग्य देखभाल आणि नाकारलेल्या पाण्याचा सुरक्षित पुनर्वापर यांना प्रोत्साहन देणे अधिक परिणामकारक ठरेल. महापालिकेने या केंद्रांच्या पाणीवापराचा सर्वेक्षणाधारित आढावा घ्यावा आणि आवश्यक तांत्रिक मार्गदर्शन उपलब्ध करून द्यावे. महापालिकेने सर्वसामान्य नागरिकांना वाहने धुताना पाण्याचा अपव्यय टाळण्याचा इशारा दिला असेल, तर व्यावसायिक वाहन धुलाई केंद्रांच्या पाणीवापराचाही विचार झाला पाहिजे. वाहन धुण्यासाठी वापरले जाणारे पाणी, धुलाईची पद्धत, उपकरणांची कार्यक्षमता आणि पुनर्वापराच्या सुविधांचा आढावा घेणे आवश्यक आहे. प्रत्येक वॉशिंग सेंटरमध्ये सारखाच पाणीवापर होत नाही. काही केंद्रांमध्ये नियंत्रित पाणीपुरवठा करणारी उपकरणे किंवा पुनर्वापराच्या सुविधा असू शकतात. त्यामुळे सर्वच केंद्रांवर अपव्ययाचा ठपका ठेवणे अन्यायकारक ठरेल. पण प्रत्यक्ष तपासणी न करताच या क्षेत्रातील पाणीवापराकडे दुर्लक्ष करणेही योग्य ठरणार नाही. पिण्यायोग्य पाण्याचा वापर कुठे आवश्यक आहे, कुठे पर्यायी पाणी वापरता येईल आणि कुठे पुनर्वापराची व्यवस्था उभारता येईल, याबाबत महापालिकेने स्पष्ट मार्गदर्शक तत्त्वे तयार करावीत. आवश्यक परवानग्या, लागू नियम आणि पाणीटंचाईची तीव्रता लक्षात घेऊन व्यावसायिक वापराचे नियमन केले पाहिजे. केवळ दंडाची भीती दाखविण्यापेक्षा पाणीबचतीच्या व्यवहार्य उपायांना प्रोत्साहन देणे हा अधिक शाश्वत मार्ग आहे. महापालिकेने पाणीचोरी, अनधिकृत नळजोडण्या आणि अपव्यय रोखण्यासाठी दोन विशेष भरारी पथके नियुक्त केली आहेत. जालना-जायकवाडी मुख्य जलवाहिनीवरील अनधिकृत नळजोडण्या आणि जलसाठ्यांवरील अनधिकृत विद्युत मोटारींवर लक्ष ठेवण्याबरोबरच शहरातील पाणीगळती व गैरवापर रोखण्याची जबाबदारी या मोहिमेत महत्त्वाची आहे. पण या पथकांचा भर नेमका कोणत्या बाबींवर राहणार? अनधिकृत जोडण्या शोधणे आणि पाणीचोरी रोखणे याबरोबरच व्यावसायिक आस्थापनांतील पाणीवापराचे मूल्यमापन होणार आहे का? जार विक्री केंद्रे, वाहन धुलाई केंद्रे आणि मोठ्या प्रमाणावर पाणी वापरणाऱ्या इतर आस्थापनांची तपासणी केली जाणार आहे का? या प्रश्नांची स्पष्ट उत्तरे प्रशासनाने द्यावीत. पाणीबचतीची मोहीम व्यापक आणि परिणामकारक करायची असेल, तर तिचा आवाका घरगुती वापरापुरता मर्यादित राहता कामा नये. जिथे पाण्याचा अपव्यय होत असल्याचे प्रत्यक्ष पुराव्यांतून आढळेल, तिथे लागू नियमांनुसार कारवाई झाली पाहिजे. मात्र, कोणत्याही व्यवसायाला केवळ संशयावरून लक्ष्य करण्याऐवजी वस्तुस्थिती, तांत्रिक निकष आणि कायदेशीर तरतुदी यांच्या आधारे निर्णय घेतले गेले पाहिजेत. पाणीबचतीच्या आवाहनाला परिणामकारक बनविण्यासाठी महापालिकेने काही ठोस प्रश्नांची उत्तरे नागरिकांसमोर ठेवणे गरजेचे आहे. - जालन्यातील पाणीपुरवठ्याची सद्यस्थिती आणि आगामी महिन्यांसाठी उपलब्ध जलसाठ्याचे नियोजन काय आहे?

- शहरातील पाणीगळती, अनधिकृत जोडण्या आणि पाणीचोरी रोखण्यासाठी आतापर्यंत किती कारवाया झाल्या?
- जार विक्री केंद्रांमध्ये पाण्याचा वापर आणि नाकारलेल्या पाण्याच्या पुनर्वापराची तपासणी केली जाणार आहे का?
- वाहन धुलाई केंद्रांसाठी पाणीबचतीच्या कोणत्या उपाययोजना सुचविण्यात येणार आहेत?

# दोन वर्षांची साधना, ५२ तासांचे संगीतमय महाकाव्य! मधुश्री आणि रॉबी बादल यांच्या 'श्री रामचरितमानस'चा टीझर लाँच

करण राझदान, ओमा द अक्क आणि डॉ. खोजा यांच्याकडून प्रकल्पाचे कौतुक; अनूप जलोटा, कैलाश खेर, कुमार सानू आणि मंदाकिनी यांनी व्हिडिओ संदेशांतून दिल्या शुभेच्छा गोस्वामी तुलसीदास यांनी रचलेली कालजयी कृती श्री रामचरितमानस आता ५२ तासांच्या भव्य संगीतमय सादरीकरणातून रसिकांसमोर येणार आहे. प्रसिद्ध बॉलिवूड गायिका मधुश्री यांच्या सुरेल आवाजात आणि संगीतकार रॉबी बादल यांच्या संगीताने सजलेल्या या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाचा टीझर मुंबईत एका कार्यक्रमात लाँच करण्यात आला. ही संगीतमय निर्मिती साकारण्यासाठी दोन्ही कलाकारांनी जवळपास दोन वर्षे समर्पित केली. हा टीझर रॉयंट म्युझिक या म्युझिक लेबलअंतर्गत प्रदर्शित करण्यात आला आहे. टीझर लाँच सोहळ्याला आध्यात्मिक गुरू ओमा द अक्क, निर्माता-दिग्दर्शक आणि अभिनेते करण राझदान, अभिनेता गगन मलिक, वास्तुतज्ज्ञ डॉ. खोजा, अभिनेत्री कंपल पटेल, पराग चापेकर आणि महिमा भारद्वाज यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. भारतीय आध्यात्मिक परंपरा आणि संगीत यांचा सुंदर संगम घडवणारा हा महत्त्वपूर्ण उपक्रम असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले. ''मी केवळ गायले नाही, तर साधनाही केली'' मधुश्री आपला अनुभव सांगताना मधुश्री म्हणाल्या, ''संपूर्ण रामकथा आता एका संगीतमय प्रवासातून ऐकता येणार आहे. मी रामजींच्या नावाने स्वतःला समर्पित केले. गेल्या दोन वर्षांहून अधिक काळ मी रामचरितमानस गात राहिले आणि भक्तिभावात



तल्लीन झाले.'' त्या पुढे म्हणाल्या, ''मी बंगाली आहे आणि संपूर्ण रामचरितमानस अवधी भाषेत गाणे हे माझ्यासाठी मोठे आव्हान होते. मात्र, रामजींचे नाव घेऊन सुरुवात केली तेव्हा त्यांचा आशीर्वाद मिळाल्याची जाणीव झाली. रामचरितमानसची कथा इतकी भावस्पर्शी आहे की गाताना अनेकदा माझ्या डोळ्यांत अश्रू आले. चित्रपटातील गाणी गाताना यश आणि लोकप्रियतेची अपेक्षा असते; मात्र या प्रकल्पाबाबत माझ्या मनात तशी कोणतीही अपेक्षा नव्हती. मी हे गायन भक्तिभावाने केले. मी केवळ गायले नाही, तर साधनाही केली, असे मी म्हणेन.'' रॉबी बादल म्हणाले, ''मधुश्रीच्या आवाजाशिवाय हे शक्य झाले नसते'' संगीतकार रॉबी बादल म्हणाले, ''श्री रामचरितमानसला या स्वरूपात साकार करणे सोपे नव्हते. मधुश्रीच्या आवाजाशिवाय हे शक्य झाले नसते. रामचरितमानसला संगीतबद्ध करण्याचे भाग्य मला मिळेल, असे मी कधीच विचार केले नव्हते. मी एका छोट्या गावातून आलो आहे आणि माझ्यासाठी ही खूप मोठी गोष्ट आहे.'' या सादरीकरणात सुरेल चालींसोबत आजच्या श्रोत्यांना लक्षात घेऊन संगीत संयोजन करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. नवरात्रीदरम्यान नऊ भजने प्रदर्शित करण्याची योजना असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. मधुश्री यांच्या समर्पणाचे कौतुक करताना त्यांनी सांगितले की, हा प्रकल्प आर्थिक लाभासाठी नव्हे, तर भक्तिभावनेतून साकारण्यात आला आहे. ओमा द अक्क यांच्याकडून नव्या पिढीला संस्कृतीशी जोडण्याच्या प्रयत्नाचे कौतुक आध्यात्मिक गुरू ओमा द अक्क यांनी मधुश्री यांच्या समर्पणाचे कौतुक करताना सांगितले, ''आज कला अनेकदा व्यवसाय आणि प्रसिद्धीच्या दृष्टिकोनातून पाहिली जाते. अशा काळात मधुश्री यांनी आपल्या आयुष्यातील आणि कारकिर्दीतील दोन वर्षे रामचरितमानससाठी समर्पित केली आहेत. त्यांची भक्तिभावना खरोखरच कौतुकास्पद आहे.'' ते पुढे म्हणाले, ''या ५२ तासांच्या सादरीकरणातून विशेषतः जेन-झी या नव्या पिढीला भारतीय संस्कृतीशी जोडण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. हा अल्बम पिढ्यान्□पिढ्या ऐकला जावा, अशा माझ्या शुभेच्छा आहेत.'' करण राझदान यांनी दिल्या शुभेच्छा, हिंदुत्व या चित्रपटाचे दिग्दर्शक करण राझदान म्हणाले की, मधुश्री गेल्या दोन वर्षांपासून रामचरितमानसच्या या प्रकल्पाबद्दल सांगत होत्या. त्यांनी मधुश्री आणि रॉबी बादल यांचे या मोठ्या प्रयत्नाबद्दल अभिनंदन केले आणि ही संगीतमय प्रस्तुती भविष्यातील पिढ्यांपर्यंत पोहोचेल, अशी आशा व्यक्त केली. वास्तुतज्ज्ञ डॉ. खोजा आणि इतर मान्यवरांनीही दोन्ही कलाकारांना शुभेच्छा दिल्या. डॉ. खोजा यांनी प्रभू श्रीरामांच्या नामस्मरणातील आध्यात्मिक शक्तीचा उल्लेख करत या उपक्रमाचे कौतुक केले. अनूप जलोटा, कैलाश खेर, कुमार सानू आणि मंदाकिनी यांचे शुभेच्छा संदेश व्हिडिओ संदेशांद्वारे पद्मश्री पुरस्कारप्राप्त अनूप जलोटा, गायक कैलाश खेर, कुमार सानू आणि अभिनेत्री मंदाकिनी यांनी मधुश्री व रॉबी बादल यांना शुभेच्छा दिल्या. अनूप जलोटा यांनी मधुश्री यांचे अभिनंदन करत त्यांनी अतिशय सुंदर काम केल्याचे सांगितले. या ५२ तासांच्या संगीतमय सादरीकरणातून तुलसीदास यांच्या अजरामर रचनेला नव्या संगीत स्वरूपात श्रोत्यांपर्यंत पोहोचवण्याचा निर्मात्यांचा प्रयत्न आहे. भक्ती, साहित्य आणि संगीत यांचा हा संगम रसिकांच्या मनावर किती प्रभाव पाडतो, हे येणाऱ्या काळात स्पष्ट होईल.

पान १ व ४ वरुन...

### टंचाईग्रस्त गावांना...

असल्याचे श्रीमती मित्तल यांनी सांगितले. या अभियान अंतर्गत जिल्ह्यातील अतिसंवेदनशील गावांना विविध उद्योजक, कॉर्पोरेट सामाजिक उत्तरदायित्व (सीएसआर) निधी आणि स्वयंसेवी संस्थां, विविध संघटनाच्या माध्यमातून दत्तक देण्याचे नियोजन आहे. या गावांमध्ये सर्वप्रथम जलव्यवस्थापनाच्या कामांना प्राधान्य दिले जाणार आहे. त्यानंतर गावातील प्रत्यक्ष गरजांची नोंद असलेल्या नोंदवहीनुसार शालेय साहित्य किट, आरोग्य किट, जनावरांसाठी चारा बँक आदी उपक्रम राबविण्यात येतील. गावांच्या गरजांनुसार नियोजनबद्ध मदत उपलब्ध करून देणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. या अभियानाचे वैशिष्ट्य म्हणजे समाजातील प्रत्येक घटकाला मदतीत सहभागी होण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. 'विश्वासाचे कर्ज' या संकल्पनेतून 'रंग दे' या आरबीआय-नियंत्रित पीअर-टू-पीअर मंचाद्वारे शेतकरी आणि महिला बचत गटांना थेट आर्थिक मदत करण्याचा पर्याय उपलब्ध करून देण्यात आल्याची माहिती श्रीमती मित्तल यांनी दिली. याशिवाय, दुष्काळग्रस्त गावातील कुटुंबाचा येणाऱ्या नऊ महिन्यांच्या कालावधीत सांभाळ करण्यासाठी 'कुटुंब दत्तक' हा उपक्रम जिल्ह्यात राबविण्यात येणार आहे. स्थानिक अर्थव्यवस्थेला बळकटी देण्यासाठी गावातील शेतकरी आणि महिला बचत गटांनी तयार केलेल्या उत्पादनांच्या खरेदीला प्राधान्य देण्याचे आवाहनही या अभियानातून करण्यात येणार आहे. तसेच गरजू नागरिक आणि मदत करण्यास इच्छुक घटक यांच्यात थेट समन्वय निर्माण करणे, गावांच्या मूलभूत गरजांना प्राधान्य देणे आणि समाजातील विविध घटकांचा सहभाग वाढविणे, हा या त्रिस्तरीय अभियानाचा मुख्य हेतू आहे. प्रशासनाच्या समन्वयातून उद्योग, सामाजिक संस्था आणि सामान्य नागरिक एकत्र आल्यास दुष्काळग्रस्त गावांना दिलासा मिळण्यास मदत होऊ शकते. 'जालना साथ देईल' या संकल्पनेतून सामूहिक सहभागाच्या बळावर जिल्ह्यातील गावांच्या गरजा पूर्ण करण्याचा जिल्हा प्रशासनामार्फत प्रयत्न केला जाणार असल्याचे ही श्रीमती मित्तल यावेळी म्हणाल्या. दुष्काळग्रस्त भागातील नागरिकांच्या हाताला काम मिळावे आणि त्यांच्या उपजीविकेला आधार मिळावा, यासाठी प्रशासनाकडून 'व्हिबी-जी रामजी' योजनेअंतर्गत दररोज प्रत्येक व्यक्तीला रोजगार उपलब्ध करून देण्याचे नियोजन करण्यात आले आहे. या माध्यमातून गरजू कुटुंबांना रोजगाराची संधी उपलब्ध करून देतानाच त्यांच्या आर्थिक अडचणी कमी करण्यावर भर दिला जाणार आहे. जलव्यवस्थापन, गावांच्या मूलभूत गरजांची पूर्तता आणि रोजगारनिर्मिती यांची सांगड घालून दुष्काळग्रस्त गावांना दिलासा देण्याचा प्रशासनाचा प्रयत्न आहे. तसेच जिल्ह्यात जलसंधारण आणि भूजलपातळी वाढविण्याच्या उद्देशाने 'व्हिबी-जी रामजी' योजनेअंतर्गत प्रत्येक गावात २०० जलतारा (शोषखड्डे) तयार करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. पावसाचे पाणी जमिनीत मुरवून भूजल पुनर्भरणाला चालना देणे, पाण्याची उपलब्धता वाढविणे आणि भविष्यातील पाणीटंचाईची तीव्रता कमी करणे, हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे दुष्काळग्रस्त गावांमध्ये जलव्यवस्थापनाला प्राधान्य देत रोजगारनिर्मिती आणि जलसंधारणाची कामे एकत्रितपणे राबविण्यावर प्रशासनाचा भर राहणार असल्याचे त्यांनी सांगितले. गावाने आपल्याला नेहमीच समृद्ध केले आहे. आता दुष्काळाच्या या कठीण प्रसंगात गावाच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याची आपली नैतिक जबाबदारी आहे. प्रत्येक नागरिकाने आणि उद्योगाने यात मनापासून योगदान द्यावे.' असे ही आवाहन जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी केले.

### व्हीलचेअरवर मंत्रालयात...

शेतकरी कुटुंबांच्या भविष्याला त्यांनी प्राधान्य दिले.

रामनगर परिसरातील या शेतकऱ्यांच्या जमिनी कर्जासाठी तारण असल्यामुळे त्यांना इतर बँकांकडून कर्ज मिळण्यात अडचणी येत होत्या. शेतीसाठी आवश्यक भांडवलाचा मार्ग अडल्याने अनेक कुटुंबे वर्षानुवर्षे आर्थिक विवंचनेत होती. कर्ज फेडण्याची चिंता आणि नव्या हंगामासाठी पैसा उभा करण्याची धडपड, अशा दुहेरी संकटात शेतकरी हतबल झाले होते.

ही परिस्थिती लक्षात घेऊन खोतकर यांनी प्रश्नाचा सातत्याने पाठपुरावा केला आणि संबंधित यंत्रणांना निर्णयासाठी एकत्र आणले. आजच्या बैठकीतील निर्णयामुळे या प्रयत्नांना ठोस यश मिळाले आहे. शासनाकडून तडजोडीची रक्कम भरल्यानंतर आणि बँकेची आवश्यक प्रक्रिया पूर्ण झाल्यावर संबंधित कर्जखाती निकाली निघून जमिनींवरील तारण व बोजा मुक्त करण्याचा मार्ग मोकळा होणार आहे. त्यामुळे पात्रतेनुसार नव्याने पीककर्ज व इतर शेतीकर्ज घेणे शेतकऱ्यांना सुलभ होईल.

हा निर्णय केवळ कर्जाचा हिशेब मिटवणारा नाही; तो दीड हजार कुटुंबांच्या आयुष्यात नव्या आशेचा दिवा लावणारा आहे.

अनेक वर्षांपासून कर्जाच्या सावटाखाली असलेल्या शेतकऱ्यांना आपल्या जमिनीवर नव्या उमेदीने शेती करता येण्याची आशा निर्माण झाली आहे. कर्जमुक्तीचा खुला झालेला मार्ग या कुटुंबांची दिवाळी खऱ्या अर्थाने गोड करणारा ठरणार आहे.

बैठकीत सहकार विभागाचे वरिष्ठ अधिकारी, युनियन बँक ऑफ इंडियाचे वरिष्ठ प्रतिनिधी, संस्थेचे पदाधिकारी आणि कर्जदार शेतकरी प्रतिनिधींनी सहभाग घेतला.

सहकार आयुक्त दीपक तावरे यांनी दूरदृश्य प्रणालीद्वारे सहभाग घेतला. जिल्हा उपनिबंधक विष्णू रोडगे, अग्रणी बँक व्यवस्थापक मंगेश केदार, युनियन बँकेचे गौरव सोनवणे, रामनगर शाखेचे संबंधित अधिकारी व कृषी अधिकारी रवि शिंदे, संस्थेचे चेअरमन तुकाराम शेजुळ, व्हाईस चेअरमन संजय शेजुळ, व्यवस्थापक संदीप शेजुळ तसेच नगरसेविका दर्शना खोतकर झोल यांचा सहभाग होता. शेतकरी प्रतिनिधी म्हणून मुरली आबा थेटे , नरसिंग गोरे, बापूराव जाधव, पांडुरंग डोंगरे, रवी गोरे, नारायण गोरे, विष्णू पाचफुले, संतोष रासवे, मेघराज चौधरी, आपासाहेब डोंगरे, भाऊसाहेब गोरे, शिवाजी गोरे आणि एकनाथ गोरे यांनी सहभाग घेतला.

स्वतःच्या पायाला दुखापत असतानाही शेतकऱ्यांना पुन्हा स्वतःच्या पायावर उभे करण्यासाठी खोतकर मंत्रालयात पोहोचले.✽ त्यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याने १८ गावांतील दीड हजार शेतकरी कुटुंबांच्या कर्जमुक्तीचा मार्ग खुला झाला आहे.

### परतूर नगरपालिकेत...

लाखो-कोट्यवधी रुपयांच्या विकासकामांच्या फाईल्स अडवून टक्केवारी उकळण्याचे उद्योग जोरात सुरू आहेत, तर दुसरीकडे दिवस-रात्र अस्वच्छतेत काम करून शहर स्वच्छ ठेवणाऱ्या गरीब सफाई कामगारांचे पगार काढण्याकडे प्रशासनाचे अक्षम्य दुर्लक्ष होत आहे. महिनोनमहिने सफाई कामगारांचे वेतन रखडल्याने त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे. स्वतःच्या हक्काच्या पगारासाठी सामान्य कर्मचाऱ्यांना पायपीट करावी लागत असताना अधिकारी मात्र केवळ टक्केवारीच्या हिशोबात मग्न असल्याचा तीव्र संताप व्यक्त होत आहे.

२ लाख रुपये उधळत भ्रष्टाचाराची लक्तरे वेशीवर टांगली ! अनेक महिन्यांपासून सुरू असलेली ही आर्थिक पिळवणूक, कामातील अडवणूक आणि गोरगरीब कामगारांची होणारी हेळसांड पाहून अखेर माजी उपनगराध्यक्ष मोहन अग्रवाल यांचा संयम सुटला. त्यांनी थेट पालिकेत जाऊन संबंधितांच्या भ्रष्ट वृत्तीचा पर्दाफाश करण्यासाठी २ लाख रुपयांची रोकड उधळली. ''जर तुम्हाला फक्त पैशांचीच हाव असेल, तर हे घ्या पैसे!'' अशा शब्दांत त्यांनी भ्रष्ट व्यवस्थेला चपराक लगावली. प्रशासकीय कारवाईकडे संपूर्ण परतूरकरांचे लक्ष - या धडक आंदोलनानंतर परतूर शहरासह राजकीय आणि प्रशासकीय वर्तुळात प्रचंड भूकंप झाला आहे. आता या प्रकरणाची वरिष्ठ पातळीवरून चौकशी होणार का? लाचलुचपत प्रतिबंधक विभाग () आणि जिल्हा प्रशासन या भ्रष्ट अधिकाऱ्यांवर काय कारवाई करणार? याकडे सर्वांचे डोळे लागले आहेत. माजी उपनगराध्यक्ष मोहन अग्रवाल यांचा जळजळीत इशारा - ''परतूर नगरपालिकेतील भ्रष्टाचार आता सर्व मर्यादा ओलांडून गेला आहे. विकासकामांचे बांधकाम अहवाल सर्व तपासण्यांनंतर पूर्णपणे ओके असतानाही केवळ लाचेसाठी फाईल्स ६-६ महिने रोखून धरल्या जात आहेत. २० ते ५० लाख रुपयांच्या अनामत रकमा अडवून ठेवून लेखापरीक्षक रघुराज चव्हाण थेट १० टक्के टक्केवारीची उघड मागणी करत आहेत. शहराची सेवा करणाऱ्या सफाई कामगारांचे पगार काढायला यांच्याकडे वेळ नाही, पण स्वतःचे खिसे भरण्यासाठी सर्वसामान्य आणि कंत्राटदारांची अडवणूक केली जात आहे. या निर्लज्ज आणि लाचखोर कारभाराची चीड आल्यामुळेच मी हे २ लाख रुपये उधळले आहेत. भ्रष्टाचाराचा हा बाजार आम्ही खपवून घेणार नाही. जोपर्यंत या भ्रष्ट अधिकाऱ्यांवर कठोर फौजदारी कारवाई होत नाही, तोपर्यंत हा लढा अधिक तीव्र केला जाईल !'' - मोहन अग्रवाल, माजी उपनगराध्यक्ष, परतूर.

### कास्ट्राईबचे ४६...

महेंद्र गिरी, विश्वास भारती, संभाजी माने, दिलीप चव्हाण, भगवान तनपुरे, श्री कोकाटे, जुबेर शेख,आरोग्य संघटनेचे जिल्हाध्यक्ष भानुदास काळे, जगदीश सरदार, रविकुमार हनवते कृषी चे सतीश कमाने, अमित बोरकर, सुशील हिवाळे, राम पवार,प्रशांत गायकवाड वन विभाग यांच्यासह महासंघाचे पदाधिकारी उपस्थित होते.

### शेतकऱ्यांच्या...

व्हावा यासाठी शेतकऱ्यांकडून लागवड करण्यात आलेल्या चाऱ्याची शासन हमी भावाने खरेदी करण्यात येईल, असेही मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले. कर्ज वसुलीसाठी शेतकऱ्यांकडे तगादा लावू नये अशा सूचना देण्यात आल्या आहेत. राज्यात शेतीसाठी साडेसात अश्वशक्तीपर्यंत वीज पुरवठा

मोफतच आहे. यातूनही वीज बिलासाठी कुणी तगादा लावत असेल, तर त्यांना तसे न करण्याबात सक्त सूचना देण्यात येतील. कर्ज वसुलीसाठीही शेतकऱ्यांना तगादा लावू नये, असे निर्देश सोसायट्या आणि जिल्हा बँकांना देण्यात आल्या आहेत. मायक्रो फायनान्स कंपन्यांवरही लक्ष ठेवण्यात येत असून, त्यांनीही आततायी पणा करू नये असा स्पष्ट सूचना देण्यात आल्याचे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले.

### मंठा चौफुली ते न्हावा...

नागरिकांना प्रत्यक्ष दिलासा मिळण्यासाठी खड्डे बुजविण्याचे काम किती लवकर पूर्ण होते आणि दुरुस्तीचा दर्जा कसा राखला जातो, याकडे वाहनधारकांचे लक्ष लागले आहे. त्यामुळे संबंधित विभागाने निर्देशांची प्रभावी अंमलबजावणी करून या मार्गावरील वाहतूक सुरक्षित व सुरळीत करण्याची गरज आहे.

### अंबड येथे होणाऱ्या...

मराठवाड्यातील व्यक्ती आणि संस्थांना 'यशवंत पुरस्कारा'ने सन्मानित करण्यात येते. अशा विविध उपक्रमांच्या माध्यमातून यशवंत प्रतिष्ठान समाजात सकारात्मक परिवर्तन घडवून आणण्यासाठी सातत्याने कार्यरत आहे. याच वैचारिक बांधिलकीतून कायद्याची भाषा सर्व सामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रतिष्ठानने आता या राज्यस्तरीय संमेलनाचे आयोजन केले आहे. या संमेलनात विधिज्ञ, न्यायाधीश, साहित्यिक, पत्रकार, कलावंत आणि सामाजिक कार्यकर्ते सहभागी होणार आहेत. संमेलनाध्यक्षपदी निवड झालेले न्यायमूर्ती प्रसन्न भालचंद्र वराळे हे मराठवाड्याच्या भूमीत शिक्षण घेऊन उच्च न्यायालयापासून सर्वोच्च न्यायालयापर्यंत पोहोचलेले व्यासंगी, निःस्पृह आणि संवेदनशील व्यक्तिमत्त्व आहेत. मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती, कर्नाटक उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती आणि सध्या भारताच्या सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती म्हणून त्यांनी केलेले न्यायदान सामाजिक भान जपणारे ठरले आहे. संविधानावरील त्यांची गाढ निष्ठा आणि न्यायव्यवस्थेतील त्यांचे महत्त्वपूर्ण योगदान लक्षात घेता, त्यांची संमेलनाध्यक्षपदी झालेली निवड संमेलनाला मोठी वैचारिक उंची प्रदान करणारी ठरणार आहे. ५व ६डिसेंबर रोजी होणाऱ्या या संमेलनाची सुरुवात भव्य ग्रंथदिंडी आणि संविधान जागर दिंडीने होणार आहे. या दोन दिवसीय संमेलनात कायदा आणि साहित्य, सामाजिक न्याय तसेच मराठी भाषेतील कायदेविषयक साहित्य अशा विविध विषयांवर परिसंवाद, अभ्यासपूर्ण व्याख्याने, काव्यवाचन आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती ॲड. खोरे यांनी यावेळी दिली. संमेलनाचा सविस्तर कार्यक्रम लवकरच जाहीर करण्यात येणार असून, सर्वसामान्य नागरिक, साहित्यिक, विधिज्ञ आणि अभ्यासकांनी या संमेलनाला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन ॲड. संजय खोरे यांनी केले आहे.यावेळी स्वामी विवेकानंद वाचनालयाचे अध्यक्ष शिवाजी धुपे, प्राचार्य विश्वास कदम, राजेश भापकर, संतोष मोटे, अरुण ठेंग आणि रमेश मायंदे यांची उपस्थिती होती.

### वाचनातून करियरचा...

त्यातील प्रत्येक शब्द आपले भविष्य घडवू शकते. वाचन करुन आपण खुप मोठे व्हा. सीमा कुलकर्णी मनोगत व्यक्त करतांना म्हणाल्या की, आई-वडीलांनी घरामध्ये वाचन करावे म्हणजे त्याचे अनुकरण मुले करतील व त्यांना वाचनाची आवड लागेल. वाचन केल्याने बौध्दीक क्षमता वाढते. फ.मु. शिंदेची आई ही कविता त्यांनी सादर केली. ॲड. विनोद कुलकर्णी मनोगत व्यक्त करतांना म्हणाले की, मोबाईलचा वापर कमी करुन विद्यार्थ्यांनी ग्रंथ वाचनाकडे लक्ष द्यावे कारण त्यातून योग्य दिशा मिळते.

# स्त्री शक्तीचा आदर केवळ नवरात्री पुरताच का? नवरात्रीचा मूळ गाभा आणि साधेपणा हरवत चालला

नवरात्री आणि आपली आजची मानसिकता या विषयाकडे पाहताना असे लक्षात येते की, काळानुसार मानवी स्वभाव, जीवनशैली आणि श्रध्दा ठेवण्याच्या पद्धती बदलल्या आहेत. आजच्या आधुनिक जगात नवरात्रीच्या नऊ दिवसांकडे आणि मानसिकतेकडे पाहण्याचे अनेक दृष्टिकोन समोर येतात. नवरात्री आणि आजची मानसिकता या दोन्ही गोष्टींचा परस्परसंबंध अत्यंत रंजक आणि विचार करायला लावणारा आहे. नवरात्र हा केवळ नऊ दिवस उपवास करण्याचा, गरबा खेळण्याचा किंवा धार्मिक विधींचा सण राहिलेला नाही, तर तो आजच्या मानवी मानसिकतेचे आणि बदलत्या सामाजिक दृष्टिकोनाचे प्रतिबिंब बनला आहे.

पूर्वी नवरात्र हा प्रामुख्याने कडक उपवास, व्रतवैकल्ये, पूजा-अर्चा आणि अध्यात्माचा काळ मानला जायचा. आजच्या मानसिकतेत श्रध्दा कायम आहे, पण तिचे स्वरूप अधिक उत्सवप्रिय आणि सामाजिक झाले असून भक्तीपेक्षा दिखाव्याला अधिक महत्त्व आले आहे. गरबा, दांडिया, नऊ रंगाचे कपडे घालणे आणि सोशल मीडियावर फोटो शेअर करणे याभोवती तरुणाई अधिक फिरताना दिसते. भक्तीची जागा ब-याच अंशी मनोरंजनाचे आणि ताणतणाव विसरण्याच्या साधनाने घेतली आहे. गरबा आणि दांडिया हे आता मोठे व्यावसायिक इव्हेंट्स झाले आहेत. महागडे पासेस, डिझायनर कपडे यावर होणारा खर्च आजच्या दिसण्याच्या मानसिकतेवर प्रकाश टाकतो. आजच्या मानसिकतेची एक नकारात्मक बाजू म्हणजे या सणाचे झालेले प्रचंड व्यापारीकरण. नऊ दिवसांचे पासेस, महागडे कपडे, इव्हेंट्स आणि स्पॉन्सर्स यांच्या गर्दीत सणाचा मूळ गाभा आणि साधेपणा काहीसा हरवत चालला आहे. गरब्यासाठी महागडे पासेस, डिझायनर कपडे यामुळे या सणाचे स्वरूप थोडे व्यावसायिक झाले आहे. यामुळे कधीकधी मूळ आध्यात्मिक भाव मागे पडतो की काय, अशी शंका येते. अनेकांसाठी हा सण आध्यात्मिक अनुभूतीपेक्षा स्टेटस सिम्बॉल किंवा दिखाव्याचे माध्यम बनत चालला आहे.

आजचे जीवन अत्यंत धावपळीचे आणि तणावाचे झाले आहे. अशा वेळी नवरात्रीचे नऊ दिवस अनेक लोकांसाठी मानसिक शांतता आणि डिटॉक्स करण्याचा काळ बनला आहेत. पूर्वी उपवास हा केवळ धार्मिक भाग होता, आज लोक याकडे आरोग्य आणि शरीराला विश्रांती देण्याच्या मानसिकतेतूनही पाहतात. दैनंदिन तणावातून काही काळ बाजूला होऊन मन सकारात्मक ऊर्जेने भरण्यासाठी लोक या दिवसांत देवीची उपासना करतात. नऊ दिवस केली जाणारी प्रार्थना किंवा ध्यान लोकांना मानसिक शांतता आणि सकारात्मक ऊर्जा देणारे साधन वाटते. आजच्या डिजिटल युगात माणूस स्क्रीनला खिळलेला असतो. नवरात्रीचे नऊ दिवस लोकांना घराबाहेर पडून, मित्रांना भेटण्याची आणि गरब्याच्या निमित्ताने एकत्र येण्याची संधी देतात. त्यामुळे गरबा आणि दांडिया हे केवळ नृत्य राहिले नसून, ते आजच्या पिढीसाठी ताणतणाव विसरून मुक्तपणे जगण्याचे आणि आनंद साजरा करण्याचे माध्यम बनले आहे. तसेच हा सण आता केवळ घरात पूजेपुरता मर्यादित न राहता, एकत्र येऊन आनंद साजरा करण्याचा एक मोठा सामाजिक सोहळा बनला आहे. काम, क्रोध, लोभ, मोह, मद आणि मत्सर या षडरिपूंवर विजय मिळवणे हा या सणाचा खरा उद्देश आहे.

नवरात्र म्हणजे आदिशक्तीच्या, स्त्री शक्तीच्या जागरणाचा उत्सव. आजचा सुशिक्षित समाज या नऊ दिवसांत स्त्री सबलीकरण, स्त्री शिक्षण आणि त्यांच्या हक्कांबद्दल उघडपणे बोलू लागला आहे. स्त्रीला केवळ अबला न मानता तिचे दुर्गा रूप स्वीकारण्यास तयार होत आहे म्हणजेच आजची मानसिकता या संकल्पनेला अधिक प्रगल्भतेने पाहू लागली आहे. एकीकडे समाजात कर्तृत्ववान स्त्रियांचा आदर करणे, त्यांना समान संधी देणे याविषयीची जाणीव वाढली आहे म्हणजेच सकारात्मक बदल दिसून येत आहे. तर दुसरीकडे द्वंद्व ही पहायला मिळत आहे. नऊ दिवस देवीची मनोभावे पूजा करतो. पण समाजात ख-या आयुष्यातील स्त्रियांवर होणारे अत्याचार, कौटुंबिक हिंसाचार किंवा त्यांच्याशी होणारा दुजाभाव थांबवायचा नाही म्हणजेच दुर्लक्ष करायचे. नवरात्रीत आपण दुर्गेच्या नऊ रूपांची पूजा करतो. लहान मुलींना देवी मानून त्यांचे पादपूजन करून पाय पडतो. पण दुसरीकडे, समाजात महिलांविरुध्दचे गुन्हे आणि मानसिक छळ कमी झालेला नाही. नऊ दिवस ज्या स्त्री शक्तीला आपण पूजतो, त्याच स्त्रीचा रोजच्या आयुष्यात किती आदर केला जातो म्हणजे महिलांची सुरक्षितता आणि आदर हा आजच्या मानसिकतेसमोरील मोठा प्रश्न आहे. आधुनिक महिला आता या सणाकडे स्वत:मधील दुर्गा (आत्मविश्वास आणि शक्ती) जागृत करण्याचे माध्यम म्हणून पाहत आहे. आजची स्त्री अन्यायाविरुध्द आवाज उठवण्यासाठी नवरात्रीच्या ऊर्जेचा वापर करत आहे.

आजच्या न्यूक्लियर फॅमिली आणि डिजिटल जगात माणूस एकटा पडत चालला आहे. नवरात्रीचे नऊ दिवस लोकांना एकत्र आणतात, ज्यामुळे एकटेपणाची मानसिकता दूर होऊन समाजात सुरक्षिततेची भावना निर्माण होते आणि मानसिक प्रवासाला एक नवी ऊर्जा मिळते. सर्व मतभेद, जात-पात बाजूला ठेवून एकत्र नाचणे, आनंद साजरा करणे यामुळे समाजातील एकतेची भावना बळकट होते. वर्षभराच्या थकव्यानंतर मानवी मनाला पुन्हा नवसंजीवनी देणारा हा काळ ठरतो. नवरात्रीच्या नऊ रंगाचे आजच्या काळात वेगळेच वेड आहे. कार्यालयांमध्ये, कॉलेजमध्ये सर्वजण एकाच रंगाचे कपडे घालताना दिसून येते. ही मानसिकता एकता आणि समानता दर्शवते. विषमतेच्या भिंती तोडून सर्वांनी एकत्र येण्याची ही आधुनिक मानसिकता नक्कीच कौतुकास्पद आहे. सांगायचे तात्पर्य म्हणजे आजची मानसिकता नवरात्रीकडे एक पारंपरिक धार्मिक सण म्हणून तर पाहतेच, पण सोबतीला मनोरंजन, सामाजिक एकत्रिकरण आणि मानसिक ऊर्जा मिळवण्याचे एक उत्तम माध्यम म्हणूनही याकडे बघते. नवरात्री हा केवळ एक धार्मिक सण राहिलेला नाही, तर तो सामाजिक एकत्रिकरण, आत्मपरीक्षण आणि मनोरंजनाचा एक मोठा उत्सव बनला आहे. गरज आहे ती फक्त बाह्य भपक्यापलीकडे जाऊन या सणामागील स्त्री शक्तीचा आदर आणि अंतर्मनाच्या शुद्धीकरणाचा विचार जपण्याची आणि देवीच्या रूपांमधील संयम, बुध्दी आणि करुणा हे गुण आपल्या दैनंदिन विचारांमध्ये आणि वर्तनात उतरवण्याची. जेणेकरून ख-या अर्थाने आपल्या मनातील महिषासूर रुपी नकारात्मक विचारांचा मर्दन करता येईल.

आधुनिक काळात लोकांच्या मानसिकतेत एक सकारात्मक बदलही पाहायला मिळत आहे, तो म्हणजे पर्यावरणपूरक नवरात्र. प्लास्टर ऑफ पॅरिस ऐवजी शाडूच्या मातीच्या मूर्तीची स्थापना करणे, रासायनिक रंगाऐवजी नैसर्गिक रंगाचा वापर करणे आणि ध्वनी प्रदूषण टाळण्यासाठी आवाजाची मर्यादा पाळणे याविषयी आजची तरुण पिढी जागरूक होत आहे. हा बदल समाजाच्या प्रगतीशील मानसिकतेचे लक्षण आहे. अनेक मंडळांमध्ये आता महागड्या मूर्ती किंवा सजावटीऐवजी त्या पैशातून रक्तदान शिबिरे, गरजू विद्यार्थ्यांना मदत किंवा वृक्षारोपण यासारखे सामाजिक उपक्रम राबवले जात आहेत. म्हणजेच आजची तरुण पिढी अधिक संवेदनशील होताना दिसते. लोक परंपरेचा आदर करत आहेत, पण त्यात स्वत:च्या सोयीनुसार आणि आधुनिक विचारसरणीनुसार बदलही करत आहेत.

भारतीय संस्कृतीत नारीला आदिशक्तीचे रूप मानले गेले आहे. त्यामुळे नवरात्र हा भारतीय संस्कृतील अत्यंत महत्त्वाचा, ऊर्जेचा आणि आदिशक्तीच्या उपासनेचा सण आहे. नऊ दिवस चालणा-या या उत्सवात आपण दुर्गेच्या नऊ रूपांची अत्यंत भक्तीभावाने पूजा करतो, उपवास करतो आणि तिचा जयजयकार करतो. हा सण केवळ धार्मिक विधींपुरता मर्यादित नसून तो वाईटावर चांगल्याचा विजय आणि स्त्री शक्तीचा सन्मान करण्याचे प्रतिक आहे. पण नवरात्र संपताच, या देवी सर्वभूतेषु शक्तिरूपेण संस्थिता म्हणणारे आपण, आपल्याच घरातील आणि समाजातील जिवंत स्त्रीशक्तीचा आदर करायला का विसरतो? आपण पुन्हा आपल्या जुन्या मानसिकतेकडे का वळतो? म्हणून स्त्रीशक्तीचा आदर केवळ नवरात्री पुरताच का? हा आजच्या काळातील आधुनिक समाजासमोरील एक अत्यंत गंभीर आणि विचार करायला लावणारा प्रश्न आहे.

एकीकडे आपण स्त्रीला देवीचे रूप मानून तिच्यासमोर नतमस्तक होतो, तर दुसरीकडे प्रत्यक्ष आयुष्यात अनेक स्त्रियांना दुय्यम वागणूक दिली जाते. वर्षातील नऊ दिवस तिची पूजा करणे आणि उर्वरित ३५६ दिवस तिच्या अस्तित्वाचा, तिच्या हक्कांचा आणि तिच्या भावनांचा आदर न करणे, हा एक ढोंगीपणा आहे. ख-या स्त्रीशक्तीचा आदर करायचा असेल, तर तो केवळ काही दिवसांपुरता मर्यादित न राहता दैनंदिन जीवनाचा भाग असायला हवा. आजच्या आधुनिक युगातही आपल्याला अनेक विरोधाभास पाहायला मिळतात.

नवरात्रीत रात्री उशिरापर्यंत गरबा खेळणा-या मुलींना सुरक्षित वातावरण मिळते, पण एरवी मात्र त्यांना रात्री बाहेर पडताना हजार वेळा विचार करावा लागतो. एका बाजूला कन्या पूजन केले जाते, तर दुस-या बाजूला आजही समाजात मुलगा आणि मुलगी असा भेद केला जातो. घरात आणि कामाच्या ठिकाणी रात्रंदिवस झटणा-या स्त्रीच्या कष्टाला अनेकदा गृहीत धरले जाते.

स्त्रीशक्तीचा खरा आदर केवळ मूर्तीची पूजा करण्यात किंवा तिची स्तुती गाण्यात नाही. शिक्षण, नोकरी आणि प्रगतीचे निर्णय घेताना तिला पुरुषांच्या बरोबरीने समान संधी आणि स्वातंत्र्य मिळणे आवश्यक आहे. प्रत्येक स्त्रीला घरात, रस्त्यावर आणि कामाच्या ठिकाणी सुरक्षित आणि सन्मानाचे नि रात्रीच्या वेळीही भीतीमुक्त वातावरण मिळायला हवे. तिच्या मताला, तिच्या आवडीनिवडीला महत्त्व आणि तिच्या स्वप्नांवर बंधने न घालता तिला स्वत:चे अस्तित्व निर्माण करण्याचे स्वातंत्र्य समाजात दिले पाहिजे. मुलांवर लहानपणापासूनच मुलींचा आदर करण्याचे संस्कार झाले पाहिजे. जोपर्यंत आपण घरातल्या स्त्रीला माणूस म्हणून आदर देत नाही, तोपर्यंत मंदिरातील देवीची पूजा व्यर्थ आहे. स्त्री ही केवळ चूल आणि मूल सांभाळणारी व्यक्ती नसून ती आज अंतराळापासून ते देशाच्या संरक्षणापर्यंत प्रत्येक क्षेत्रात आपले कर्तृत्व गाजवत आहे. तिच्यातील या अथांग शक्तीचा आदर रोजच्या व्यवहारात दिसणे गरजेचे आहे.

काळ बदलतो तशा सण साजरा करण्याच्या पद्धती बदलतात हे स्वाभाविक आहे.

आजच्या मानसिकतेत जरी आधुनिकता आणि मनोरंजन वाढले असले, तरी सणाचे मूळ मर्म विसरता कामा नये. नवरात्र ही केवळ नऊ दिवस नटण्याची किंवा गरबा खेळण्याची संधी नाही, तर ती स्वत:मधील नकारात्मक विचार, अहंकार आणि वाईट सवयींवर विजय मिळवण्याची पर्वणी आहे.

स्त्री ही केवळ नवरात्रीत पुजली जाणारी मूर्ती नाही, तर ती सृष्टीचे चक्र चालवणारी, कुटुंबाला आधार देणारी आणि समाजाची प्रगती साधणारी जिवंत शक्ती आहे. जोपर्यंत आपण आपल्या घरातील आई, बहीण, पत्नी आणि मुलगी यांच्या कर्तृत्वाचा आणि अस्तित्वाचा आदर करत नाही, तोपर्यंत नवरात्रीच्या पूजेला काहीच अर्थ उरणार नाही. म्हणूनच, स्त्रीशक्तीचा आदर हा केवळ नऊ दिवसांचा उत्सव न ठरता, तो ३६५ दिवसांचा जीवनमार्ग बनला पाहिजे. आपण समाजातल्या प्रत्येक स्त्रीला सुरक्षित आणि आदरयुक्त वातावरण देऊ, तरच ख-या अर्थाने देशात आणि समाजात नवरात्र साजरी होईल.

**सुनील शिरपुरे**
**कमळवेल्ली,यवतमाळ**
**भ्रमणध्वनी-७४९८८८५०६१**

# वाचन ही अनभिज्ञ कला असल्याचे ; डॉ.अब्दुल कलाम यांनी समाजाला पटवून दिले

देशात अनेक उत्सव व सांस्कृतिक कार्यक्रम मोठ्या उत्साहाने व थाटामाटात साजरे केले जातात.परंतु आजच्या अत्याधुनिक व सोशल मिडियाच्या युगात करोडो लोक दिवसेंदिवस वाचनापासुन दुरावतांना दिसत आहे. त्यामुळे देशाच्या प्रत्येक नागरिकांच्या मनात वाचनाची प्रेरणा जागृत व्हावी या उद्देशाने महान वैज्ञानिक (सायंटिस्ट),भारताचे माजी राष्ट्रपती, मिसाईल मॅन,(पद्मभूषण, पद्मविभूषण, भारतरत्न) पुरस्कार प्राप्त, देशाचे अनेक उच्च पद भुषविनारे महाज्ञानी व महान विचारवंत आणि सर्वांच्या काळजात घर करून बसणारे डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त वाचन दिवस साजरा केला जातो. ए.पी.जे.अब्दुल कलाम याचा जन्म १५ आक्टोंबर १९३१ला तामिळनाडू येथे झाला ते भारताचे अकरावे राष्ट्रपती होते.त्यांच संपूर्ण जीवन अभ्यासु वृत्तीचे असल्याने देशाच्या प्रत्येक विद्यार्थ्याच्या व युवकांच्या हृदयात एक वेगळीच छाप सोडली आहे. त्यामुळे युवावर्गाचे लाडके पुरूष म्हणून सुध्दा ख्याती आहे. ए.पी.जे.अब्दुल कलाम शिक्षणाच्या दृष्टीकोणातुन सर्वांचेच मसीहा (देवता) बनले.

त्यामुळे वाचन किती महत्त्वाचे आहे हे अब्दुल कलाम यांच्या व्यक्तिमत्त्वावरून दिसून येते. वाचन दिनाच्या निमित्ताने सर्वांनीच ए.पी.जे. अब्दुल कलाम यांनी लिहिलेल्या संपूर्ण पुस्तकांचे वाचन केलेच पाहिजे.यामुळे त्यांच्या जयंतीनिमित्त खरी श्रद्धांजली ठरेल व वाचकांमध्ये खरी सकारात्मकता, जागृगता व उत्साहाचे वातावरण दिसून येईल आणि नवीन ऊर्जा निर्माण होवून सर्वांना चांगला मार्ग मिळेल.आजची युवा पिढी ज्या जलद गतीने मोबाईलचा वापर करीत आहेत त्याच गतीने वाचन व्हायला हवे.वाचनामुळे बरंच काही अवगत करता येते हे आपल्या पुर्वजांनी दाखवून दिले आहे. वाचनामधुन मिळालेले ज्ञान आजच्या युवकांना अवश्य शिखरावर पोहचवेल यात तिळमात्र शंका नाही.आपण आज ज्याप्रमाणे मोबाईला घट्ट धरून बसतो तेही घातकच आहे. मोबाईल खेळावा,मोबाईलवर काम करावे.परंतु वाजवीपेक्षा जास्त मोबाईलचा वापर केला तर ते अवश्य नुकसानदायक आणि घातक ठरेल आणि ठरत आहे यातही तिळमात्र शंका नाही.परंतु वाचनाच्या बाबतीत तसे नाही आपण वाचनाला जितका जास्त वेळ द्याल त्यांच्या दुप्पट ज्ञानामध्ये भर पडेल, बुध्दीला चालना मिळेल, डोळ्यांचा व्यायाम होतो आणि वाचनातील ज्ञान हे अनंत काळापर्यंत आपल्या हृदयात राहील. त्यामुळे आपण जे काही वाचन केले आहे ते ज्ञान समाजापर्यंत पोहोचविण्यासाठी आपण सहज मदत करू शकतो. आज मोबाईलचा विचार केला तर त्याची रेकॉर्ड ब्रेक निर्यात झाल्याचे सांगितले जाते. भारताच्या चालू वित्तीय वर्षात मोबाईल फोनची निर्यात १५ अरब डॉलरच्या जवळपास झाली आहे. म्हणजेच ६० हजार करोड रूपयांची निर्यात.याच्या तुलनेत पुस्तकांची निर्यात



अल्पशी दिसून येते.म्हणजेच मोबाईलच्या तुलनेत देशातील लोकांचे वाचन दिवसेंदिवस कमी-कमी होत असल्याचे यावरून स्पष्ट दिसून येते.देशाचे माजी राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचा १५ आक्टोंबर हा जन्म दिवस देशातील शाळा, महाविद्यालयांमध्ये ''वाचन प्रेरणा दिन'' म्हणून मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो.

परंतु वाचनाची प्रेरणा ही फक्त शाळा किंवा महाविद्यालयापुर्ती सीमीत नसावी; तर देशाच्या १४५ कोटी जनतेच्या नसानसात जायला हवी.कारण यामुळे मुलांवर चांगले संस्कार होतील व वाचनाची गती वाढेल व ज्ञानाचे फळ आपल्या कुटुंबीयांना व परिवाराला अवश्य मिळेल. वाचन काय आहे हे जर कोणाला जानुण घ्यायचेच असेल तर डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांनी लिहिलेल्या किमान एका पुस्तकाचे तरी वाचन करावे. भारतील संस्कृती अनभिज्ञ आहे भारतात सर्वंच धर्माचे, पंथाचे,जातीचे लोक राहातात.त्यामुळे प्रत्येक धर्मानुसार वेगवेगळे सण उत्सव साजरा होतांना आपण पहातो अशा उत्सवाच्या निमित्ताने मित्रांना, बहीणीला,भावाला किंवा अन्य कोणाला आपण भेट वस्तू देतोच अशा परिस्थितीत आपणाला काय भेट वस्तू द्यायची ती अवश्य द्यावी याचा विरोध नाही.परंतु यात एका पुस्तकाची भर अवश्य टाकली पाहिजे.यामुळे वाचनाला सर्वच स्तरातून प्रेरणा मिळेल असे मला वाटते.आपण पहातो देशात प्रत्येक घरामध्ये लहान- मोठ्यांचा वाढदिवस साजरा करण्यात येतो अशा परिस्थितीत भेट वस्तू म्हणून पुस्तके अवश्य भेट द्यायला हवी यामुळे बुध्दीचा विकास अवश्य होईल.कारण डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांनी वाचन आणि लेखन यातुनच उंच भरारीमारून मोठे शिखर गाठले आहे हे सर्वांनाच ग्यात आहे.आपण त्यांच्या प्रत्येक कार्याचे अनुकरण करने गरजेचे आहे ही त्यांच्या जयंती निमित्त खरी श्रद्धांजली ठरेल.देशातील विद्यार्थी व युवा वर्गाने सोशल मीडियाचा अवश्य वापर करावा. परंतु वाचनामध्ये कोणताही अडथळा निर्माण होणार नाही याचीही दक्षता घ्यावी व वाचन नियमित ठेवावे. आपण वाचनाचा विचार केला तर देशात ऋषी-मुनी, ज्ञानी, विचारवंत,थोरपुरूष, क्रांतिकारक, वैज्ञानिक, डॉक्टर, शास्त्रज्ञ, बुध्दीजीवी, थोर महात्मे हे संपूर्ण पुस्तकी वाचनातुनच निर्माण झालेले वटवृक्ष आहेत आणि त्यांच्यामुळेच देशात सुखशांती दिसून येते त्यामुळे वाचनाची कास सर्वांनीच धरली पाहिजे. वाचनाची परंपरा अनंत काळापासून आहे आणि आता ही साबुत ठेवण्याची संपूर्ण जबाबदारी युवा वर्गावर आहे,ही जबाबदारी युवा पिढी व विद्यार्थी अवश्य स्विकारेल याची मला खात्री आहे.ज्यांना पुस्तकी वाचन अवघड वाटत असेल त्यांनी दररोज वृत्तत्रांचे वाचन केलेच पाहिजे यामुळे देश -विदेशातील घडामोडींची माहिती अवगत होईल व हळूहळू पुस्तक वाचनाकडे आपली वाटचाल वाढेल.आज बदलत्या हवामानामुळे व अलनिनोच्या प्रभावामुळे देशात अत्यंत गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे यावर मात करण्यासाठी वृक्षलागवडीची नितांत गरज आहे. त्यामुळे वाचन प्रेरणा दिनाचे औचित्य साधून शाळा महाविद्यालये,सामाजिक संस्था,प्रशासन विभाग यांच्या माध्यमातून आजच्या दिवसाला मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड होणे गरजेचे आहे.यामुळे ऑक्सिजनची मात्रा वाढेल व निसर्ग प्रफुल्लित रहाण्यास मोठी मदत होईल.त्याच प्रमाणे प्रत्येक झाडात,पानात,फुलात, फळांमध्ये आपल्याला ए.पी.जे.अब्दुल कलाम यांचे दर्शन अवश्य होईल व आज लावलेले झाड अनंत काळापर्यंत टिकून राहील.कारण वाचन कला हि हजारो वर्षांपासून वृक्षांच्या सानिध्यातुन निर्माण झालेली ऊर्जा आहे. त्यामुळे वाचनासोबत वृक्षांशी जवळीक साधलीच पाहिजे. माजी राष्ट्रपती ए.पी.जे.अब्दुल कलाम यांना जयंती निमित्त कोटी कोटी प्रणाम व वाचन प्रेरणा दिनाच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा!जय हिंद!

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

# संत सावता माळी: अभंग आणि विचार ग्रंथाची महाराष्ट्र शासनाच्या पुस्तक यादीत निवड

सोलापूर: सुवर्णधन प्रकाशन सेवा संस्था सोलापूर यांनी प्रोफेसर सुवर्णा सुखदेव गुंड - चव्हाण लिखित प्रकाशित केलेल्या संत सावता माळी: अभंग आणि विचार पुस्तकाची महाराष्ट्र शासनाच्या पुस्तक यादीत निवड करण्यात आली आहे. या पुस्तकाचे वैशिष्ट्य म्हणजे प्रथमच संत सावता माळी यांच्या सकलसंतगाथा मध्ये १२ अभंगाचा उल्लेख केला आहे परंतु प्रो. सुवर्णा यांनी एकुण ३७ अभंगाचे संदर्भासह संशोधन केले आहे . त्याचप्रमाणे समीक्षण व संत सावता माळी यांची शिष्य परंपरा त्यांनी संशोधीत केली आहे. संत सावता माळी यांच्या प्रत्येक पैलूंचा संशोधनात्मक रितीने प्रो.डॉ. सुवर्णा गुंड-चव्हाण या लेखिकेने परामर्श घेतला आहे. उदा. संत सावतोबांनी पर्यावरण, शेतीची पद्धती , आरोग्यासाठीचे विचार, औषध तयार करणं, मानसिक आरोग्य, सात्विक जीवन पद्धती, जीवनशैली, निष्ठा.. इत्यादी अनेक पैलूंवर सखोलपणे मांडणी केली आहे.''

या पुस्तकाचे प्रकाशन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महामंडलेश्वर मनिषानंद महाराज पुरी, कॅबिनेट मंत्री छगन भुजबळ, गृहनिर्माण व इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, प्रकाशक धनंजय चव्हाण या मान्यवरांच्या उपस्थितीत झाले. या कार्यक्रमाला सोलापूर जिल्ह्यातील राजकीय, अध्यात्मिक, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते. संत सावता माळी: अभंग आणि विचार या पुस्तकाची दखल महाराष्ट्र शासनाकडून घेण्यात आली त्याबद्दल सर्व स्तरातून स्वागत होत आहे. यापूर्वी या पुस्तकास मानाच्या राज्यस्तरीय किसन महाराज सुडके जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. वाचनीय आणि संदर्भमल्य असलेला हा ग्रंथ साकार होण्यासाठी सावता वसेकर महाराज, प्राचार्य सावता घाडगे, मुखपृष्ठकार चित्रकार सावता घाडगे, प्रकाशक धनंजय चव्हाण, प्राचार्य विजय गुंड, डायरेक्टर डॉ. संजय गुंड, प्रभु महाराज तुळशीकर , वसेकर महाराज माऊली , माऊली महाविद्यालय संस्थापक बळीराम काका साठे , संस्थाध्यक्ष बाबा साठे यांचे सहकार्य मौलिक आहे. कुलगुरू महोदय प्रोफेसर प्रकाश महानवर , प्रोव्हीसी प्रोफेसर लक्ष्मीकांत दामा , नेवासा ट्रस्टी अध्यक्ष माऊली महाराज, ग्रंथमित्र गुलाबराव पाटील, ग्रंथमित्र आराध्ये सर, ग्रंथमित्र कुंडलिकराव मोरे, डॉ.प्रदीप औजेकर, महाराष्ट्र प्रांत अध्यक्ष प्रोफेसर प्रदीपजी खेडकर, उपाध्यक्ष मसप दत्ता आण्णा सुरवसे , कार्याध्यक्ष मसप किशोरीजी चंडक ,संत सावता माळी मंदिराचे विश्वस्त व सर्व स्तरांतील मान्यवर व वाचकांनी अभिनंदन केले आहे.

# नवरात्रोत्सवात वीजपुरवठा खंडित; आमदार बबनराव लोणीकर संतप्त

**आष्टी - प्रतिनिधी**

नवरात्र महोत्सवाच्या काळात परतूर विधानसभा मतदारसंघातील आष्टी शहर व परिसरात वारंवार वीजपुरवठा खंडित होत असल्याच्या अनेक तक्रारी नागरिकांनी आमदार बबनराव लोणीकर यांच्याकडे केल्या. नवरात्रोत्सवासारख्या धार्मिक उत्सवाच्या काळात वीजपुरवठा विस्कळीत होत असल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त केली जात होती. या तक्रारींची तातडीने दखल घेत आमदार बबनराव लोणीकर यांनी वीज वितरण कंपनीच्या कार्यकारी अभियंत्यांशी दूरध्वनीद्वारे संपर्क साधून आपली तीव्र नाराजी व्यक्त केली. नवरात्रोत्सव हा हिंदू धर्मीयांसाठी श्रद्धा आणि भक्तीचा महत्त्वाचा सण आहे. या काळात शहरातील विविध धार्मिक कार्यक्रम, देवीची आरती, पूजाअर्चा तसेच इतर धार्मिक उपक्रम सुरू असताना वीजपुरवठा खंडित होणे ही नागरिकांसाठी गैरसोयीची बाब असल्याचे आमदार लोणीकर यांनी अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून दिले. नागरिकांच्या तक्रारींचे गांभीर्य लक्षात घेऊन आमदार लोणीकर यांनी संबंधित अधिकाऱ्यांना कठोर शब्दांत सूचना दिल्या. ''हिंदू धर्मीयांच्या भावना लक्षात घ्या. नवरात्र महोत्सवाच्या काळात वीजपुरवठा खंडित होणार नाही, याची दक्षता घ्या. ही शेवटची वॉर्निंग आहे. यापुढे नागरिकांना अशा प्रकारचा त्रास होऊ नये, यासाठी स्वतः लक्ष घाला आणि वीजपुरवठा तातडीने सुरळीत करा,'' अशा स्पष्ट शब्दांत त्यांनी अधिकाऱ्यांना सुनावले.

सण-उत्सवांच्या काळात नागरिकांना मूलभूत सुविधांचा त्रास होऊ नये, ही प्रशासनाची जबाबदारी आहे. विशेषतः धार्मिक कार्यक्रम सुरू असताना वीजपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी संबंधित विभागाने आवश्यक नियोजन करणे गरजेचे आहे. आष्टी शहर व परिसरातील वीजपुरवठ्याबाबत आलेल्या तक्रारींवर तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश देत आमदार लोणीकर यांनी या प्रकरणात अधिकाऱ्यांनी वैयक्तिक लक्ष घालण्याची अपेक्षा व्यक्त केली.

# प्रचाराच्या व्हिडिओमध्ये धार्मिक स्थळे, चिन्हांचा वापर करू नये

## जाहिराती व व्हिडिओ तयार करताना निवडणूक आयोगाच्या सूचनांचे पालन करण्याचे आवाहन

**छत्रपती संभाजीनगर - प्रतिनिधी**

निवडणुकीच्या प्रचारासाठी उमेदवाराच्या कार्याचा आणि कर्तृत्वाचा आढावा घेणारे व्हिडिओ तयार करण्याची पद्धत सध्या प्रचलित आहे. मात्र, हे व्हिडिओ तयार करण्यापासून त्यांना आवश्यक प्रमाणन मिळविण्यापर्यंतची प्रक्रिया वेळखाऊ असू शकते. त्यामुळे प्रचाराचे व्हिडिओ तयार करतानाच भारत निवडणूक आयोगाच्या सूचनांचे पालन करावे. आयोगाच्या निर्देशांनुसार प्रतिबंधित बाबी टाळल्यास व्हिडिओच्या प्रमाणनाची प्रक्रिया सुलभ होण्यास मदत होईल, असे आवाहन ०५ - औरंगाबाद पदवीधर निवडणूक निर्णय अधिकारी तथा विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी केले आहे. उमेदवारांच्या प्रचारासाठी वृत्तपत्रांमधील जाहिराती, प्रचाररथांवरील व्हिडिओ, समाजमाध्यमांवरील रील्स, रेडिओ व खासगी एफएम वाहिन्यांवरील जाहिराती, बल्क एसएमएस, ध्वनिमुद्रित ध्वनिसंदेश तसेच इंटरनेट संकेतस्थळांवरील जाहिराती अशा विविध माध्यमांचा वापर केला जातो.

उमेदवारांच्या प्रचारासाठी तयार करण्यात आलेल्या संबंधित जाहिराती व व्हिडिओंचे नियमानुसार माध्यम प्रमाणन व संनियंत्रण यंत्रणेकडून पूर्वप्रमाणन करून घेणे आवश्यक आहे. त्यामुळे प्रमाणनासाठी व्हिडिओ सादर करण्यापूर्वी त्यामध्ये कोणत्या बाबींचा समावेश करावा आणि कोणत्या बाबी टाळाव्यात, याची माहिती घेणे गरजेचे आहे. वृत्तपत्रांमधील जाहिरातींसाठी मतदानाच्या आधीच्या शेवटच्या दोन दिवसांत संबंधित नियमांनुसार पूर्वप्रमाणन घेणे आवश्यक आहे.



**कार्यक्रम संहितेचे पालन आवश्यक**

कार्यक्रम संहितेनुसार, प्रचाराच्या व्हिडिओमध्ये अभिरुचीहीन किंवा सभ्यतेच्या विरुद्ध असलेली दृश्ये, मित्रराष्ट्रांवरील टीका, धार्मिक किंवा जातीय तेढ निर्माण करणारी दृश्ये अथवा आक्षेपार्ह शब्दांचा समावेश नसावा. तसेच अश्लील, बदनामीकारक किंवा जाणीवपूर्वक चुकीची अथवा अर्धसत्य माहिती देणारे चित्रण, हिंसेला प्रोत्साहन देणारी दृश्ये, कायदा व सुव्यवस्थेला बाधा आणणारे प्रसारण किंवा राष्ट्रविरोधी कृत्यांना प्रोत्साहन देणारी सामग्री वापरू नये.

न्यायालयाचा अवमान करणारे, राष्ट्रपती किंवा न्यायपालिकेच्या सचोटीविषयी आक्षेपार्ह मजकूर असलेले अथवा राष्ट्रीय एकात्मतेला बाधा आणणारे प्रसारण टाळावे. नैतिक मूल्यांना बाधा आणणारी टीका, अंधश्रद्धा किंवा भोंदूगिरीला खतपाणी घालणारे चित्रण, महिलांचे विकृत चित्रण, बालकांसंदर्भातील संहितेचे उल्लंघन करणारे प्रसारण तसेच विशिष्ट भाषिक किंवा प्रादेशिक घटकांविषयी उपरोधिक अथवा निंदनीय वृत्ती दर्शविणारी दृश्ये किंवा शब्द यांचाही समावेश व्हिडिओमध्ये करू नये. याशिवाय, सिनेमॅटोग्राफ कायदा, १९५२ मधील तरतुदींचे उल्लंघन करणारे प्रसारण टाळावे.

**जाहिरात संहितेतील तरतुदींचे पालन करावे**

जाहिरात संहितेनुसार कोणत्याही वंश, जात, वर्ण, पंथ किंवा राष्ट्रीयत्वाचा उपहास करणाऱ्या, भारतीय राज्यघटनेचा अवमान करणाऱ्या अथवा गुन्हेगारी कृत्यांना प्रोत्साहन देणाऱ्या जाहिरातींना प्रतिबंध आहे. हिंसाचाराचे समर्थन करणाऱ्या, कायद्याचे उल्लंघन करण्यास प्रवृत्त करणाऱ्या किंवा अश्लीलतेचे उदात्तीकरण करणाऱ्या जाहिरातीही प्रसारित करू नयेत.

स्वतःच्या फायद्यासाठी राज्यमुद्रा, राज्यघटनेतील तरतुदी, राष्ट्रीय नेते किंवा राज्यातील व्यक्तींच्या नावांचा अथवा प्रतिमांचा गैरवापर करू नये. महिलांचे चुकीचे किंवा अवमानकारक चित्रण करणाऱ्या जाहिरातींनाही परवानगी दिली जात नाही. तसेच सिगारेट, तंबाखूजन्य पदार्थ आणि मादक पदार्थांच्या जाहिरातींवर प्रतिबंध आहे.

**प्रचाराच्या व्हिडिओमध्ये कोणत्या बाबी टाळाव्यात ?**

भारत निवडणूक आयोगाच्या माध्यमविषयक निर्देशांनुसार प्रचारासाठी व्हिडिओ तयार करताना पुढील बाबी टाळाव्यात :

१. मंदिर, मशीद, गुरुद्वारा किंवा अन्य कोणत्याही धार्मिक स्थळांची दृश्ये वापरू नयेत.

२. इतर राजकीय पक्षांवर आरोप करण्याऐवजी उमेदवाराने स्वतः केलेल्या कामांची माहिती द्यावी.

३. एकमेकांच्या खासगी आयुष्याबाबत आरोप करू नयेत किंवा असभ्य भाषेचा वापर करू नये. ४. विरोधी पक्षांविरुद्ध आक्षेपार्ह टीका-टिप्पणी किंवा हेतुपुरस्सर आरोप करू नयेत. ५. सैन्याची किंवा सैन्य अधिकाऱ्यांची छायाचित्रे वापरू नयेत.

६. अन्य कोणत्याही देशाविरुद्ध आक्षेपार्ह आरोप करू नयेत.

७. विशिष्ट जात, धर्म किंवा पंथाविरुद्ध आरोप करणारा अथवा धार्मिक तेढ निर्माण करणारा मजकूर वापरू नये.

८. कोणत्याही व्यक्तीची मानहानी किंवा अवहेलना होईल, अशी दृश्ये अथवा मजकूर वापरू नये.

९. न्यायालयाचा अवमान होईल, असा मजकूर किंवा चित्रण करू नये.

१०. देशाच्या सार्वभौमत्वाचा किंवा राष्ट्रीय एकात्मतेचा अवमान करणारी सामग्री वापरू नये.११. कोणत्याही व्यक्तीचे नाव घेऊन तिच्यावर हेतुपुरस्सर आरोप करू नयेत किंवा तिचा अपमान करू नये.

१२. मराठवाड्यातील आठही जिल्ह्यात जिल्हाधिकारी कार्यालयात माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समिती स्थापन करण्यात आली आहे. याठिकाणी आपण आपल्या जाहिराती प्रमाणीत करून घेऊ शकता.

प्रचारासाठी जाहिराती आणि व्हिडिओ तयार करताना भारत निवडणूक आयोगाच्या संबंधित नियमांचे व निर्देशांचे पालन करावे, असे आवाहनही विभागीय आयुक्तांनी केले आहे.

# सेवा संकल्प अभियानांतर्गत शालेय विद्यार्थ्यांची प्रयोगशाळेला भेट; जिल्हास्तरीय पाणी गुणवत्ता जनजागृती उपक्रम संपन्न

**जालना - प्रतिनिधी**

सेवा संकल्प अभियानांतर्गत आज जालना येथे स्वच्छता ही सेवा अभियानाच्या अनुषंगाने जिल्हास्तरीय पाणी गुणवत्ता जनजागृती कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमांतर्गत येथील स्वामी विवेकानंद विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा विभागाच्या जिल्हा पाणी तपासणी प्रयोगशाळेला भेट देऊन पाणी तपासणीच्या विविध प्रक्रिया प्रत्यक्ष समजून घेतल्या.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला जल जीवन मिशन जिल्हा परिषद, जालना चे प्रकल्प संचालक लिंबाजी बारगिरे यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. मानवी आरोग्यासाठी शुद्ध पाण्याचे महत्त्व आणि पाण्याच्या गुणवत्तेबाबत समाजात जागरूक राहणे काळाची गरज असल्याचे त्यांनी आपल्या मार्गदर्शनात अधोरेखित केले. या भेटीमुळे विद्यार्थ्यांमध्ये सुरक्षित पाणी, जलसंरक्षण व स्वच्छतेबाबत मोठी जागरूकता निर्माण झाली असून, विद्यार्थ्यांनी या उपक्रमाबद्दल सकारात्मक समाधान व्यक्त केले. सदर कार्यक्रमाचे नियोजन, सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन जिल्हा परिषद जालना चे पाणी गुणवत्ता तज्ज्ञ श्रीकांत चित्राल यांनी केले. या जिल्हास्तरीय उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये पाणी गुणवत्ता, स्वच्छता आणि आरोग्य यांच्यातील परस्परसंबंधाविषयी मोलाची माहिती मिळाली. मुख्याध्यापक व शिक्षकांची उपस्थिती या शैक्षणिक व सामाजिक उपक्रमाला स्वामी विवेकानंद विद्यालयाचे मुख्याध्यापक आर. एस. सोनवणे, पर्यवेक्षक आर. ए. जयरंगे, तसेच सहशिक्षक व्हि. के. जाधव आणि एस. बी. जिगे यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. विद्यार्थ्यांमध्ये पाणी गुणवत्ता, स्वच्छता आणि आरोग्य याविषयी जागृती निर्माण करण्यासाठी शालेय व्यवस्थापनाने या उपक्रमाला विशेष सहकार्य केले. भूवैज्ञानिकांकडून मानके व आरोग्यावरील परिणामांचे सादरीकरण

या प्रसंगी भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा विभागाचे सहाय्यक भूवैज्ञानिक सीएच गिरधरा, श्रीकृष्ण देशपांडे, कनिष्ठ भूवैज्ञानिक संदीप शिरसाट आणि मोहसीन शेख यांनी विशेष सादरीकरण केले. त्यांनी विद्यार्थ्यांना दूषित पाण्यामुळे होणारे जलजन्य आजार आणि त्यापासून स्वतः चा बचाव कसा करावा, याविषयी अत्यंत सविस्तर माहिती दिली. पाण्याचे नमुने तपासताना कोणकोणते घटक भारतीय मानक १०५००:२०१२ मधील मर्यादांशी पडताळले जातात, याची तांत्रिक माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. या मानकापेक्षा घटकांचे प्रमाण कमी-अधिक झाल्यास त्याचे मानवी आरोग्यावर कोणकोणते गंभीर परिणाम होऊ शकतात, हे तज्ज्ञांनी सोप्या भाषेत स्पष्ट केले. जैविक व रासायनिक तपासणीचे थेट प्रात्यक्षिक या उपक्रमाचे मुख्य आकर्षण म्हणजे प्रयोगशाळेतील प्रत्यक्ष प्रात्यक्षिके ठरली. प्रयोगशाळा तज्ज्ञ राहुल भवाळ, राजश्री घाटोळे व गणेश शेळके यांनी विद्यार्थ्यांना पाण्याच्या रासायनिक व जैविक तपासणीचे थेट प्रात्यक्षिक करून दाखवले. तसेच प्रयोगशाळेत वापरल्या जाणाऱ्या विविध अत्याधुनिक उपकरणांची कार्यपद्धती विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष दाखवून त्यांची माहिती दिली. या प्रत्यक्ष अनुभवामुळे विद्यार्थ्यांना पाण्याचे शुद्धीकरण आणि चाचणी प्रक्रिया जवळून अनुभवता आली.

# मनुष्यबळाचे त्रैमासिक विवरणपत्र ई-आर-१ भरण्याचे आवाहन

**जालना - प्रतिनिधी**

जिल्ह्यातील सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालये, महामंडळे, स्थानिक स्वराज्य संस्था, खासगी आस्थापना, उद्योग, कारखाने तसेच २५ किंवा त्यापेक्षा अधिक कर्मचारी कार्यरत असलेल्या सर्व आस्थापनांनी सप्टेंबर २०२६ या तिमाहीचे रोजगारविषयक विवरणपत्र ई-आर १ ऑनलाइन पद्धतीने ३० ऑक्टोबर २०२६ पर्यंत सादर करावे, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या वतीने करण्यात आले आहे. सेवायोजन कार्यालये (रिक्तपदांची सूचना देणे सक्तीचे) कायदा १९५९ व त्याअंतर्गत नियमावली १९६० नुसार संबंधित आस्थापनांना दर तीन महिन्यांनी रोजगारविषयक विवरणपत्र सादर करणे बंधनकारक आहे. त्यानुसार जुलै ते सप्टेंबर २०२६ या कालावधीतील त्रैमासिक विवरणपत्र ई-आर १ सादर करण्याची अंतिम मुदत ३० ऑक्टोबर २०२६ आहे.

हे विवरणपत्र सादर करण्यासाठी www.rojgar.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाइन सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. संबंधित आस्थापनांनी संकेतस्थळावर लॉगिन करून एम्प्लॉयर लॉगिनमध्ये जाऊन आवश्यक माहिती भरावी. त्यानंतर विवरणपत्रातील माहिती तपासून ई-आर १ ऑनलाइन सादर करावे. तांत्रिक अडचणी किंवा अधिक माहितीसाठी आस्थापनांनी सोमवार ते शुक्रवार या कार्यालयीन दिवशी सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत (०२४८२) २३०३३३ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.

निर्धारित मुदतीत विवरणपत्र ऑनलाइन सादर न केल्यास संबंधित आस्थापनांवर कायद्यानुसार कारवाई होऊ शकते. त्यामुळे जिल्ह्यातील सर्व पात्र आस्थापनांनी विहित मुदतीपूर्वी ई-आर १ विवरणपत्र सादर करावे, असे आवाहन सहाय्यक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, गणेश चिमणकर, यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

# रद्दी व निरउपयोगी वस्तू विक्रीसाठी दरपत्रके सादर करण्याचे आवाहन

**जालना - प्रतिनिधी**

जिल्हा माहिती कार्यालयातील रद्दी व निरुपयोगी वस्तू विक्री करावयाची आहे. रद्दी खरेदी करु इच्छिणाऱ्या व्यक्ती अथवा संस्थानी प्रती किलो रद्दी दर स्वतंत्रपणे बंद पाकिटात नमूद करुन जिल्हा माहिती कार्यालय, प्रशासकीय इमारत जिल्हाधिकारी कार्यालय, तळ मजला, जालना येथे दि. २३ ऑक्टोबर २०२६ पर्यंत सुटीचे दिवस वगळून कार्यालयात दरपत्रक जमा करावेत. २३ तारखेनंतर आलेले दरपत्रकाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी. असे जिल्हा माहिती अधिकारी, जालना यांनी कळविले आहे.

# वाचनातून करियरचा मार्ग जातो - मधुकर जोशी

**जालना - प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांनी करिअर घडविण्यासाठी वाचन करणे आवश्यक आहे कारण सततच्या वाचनातून करिअरचा मार्ग जातो असे प्रतिपादन छत्रपती संभाजीनगर येथील राज्य आंग्ल भाषाचे सेवानिवृत्त प्राध्यापक मधुकर जोशी यांनी केले.

ग्रंथ संग्रहालय श्रीराम वाचनालय येथे भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांचा जन्मदिवस वाचन प्रेरणा दिनानिमित्ताने आयोजित ''वाचनातून करिअर घडतं...'' या विषयावरील व्याख्यान व शालेय विद्यार्थी ग्रंथालय भेट कार्यक्रमा प्रसंगी मुख्य वक्ता म्हणून ते बोलत होते.



याप्रसंगी व्यासपीठावर श्री एम.एस.जैन इंग्लिश स्कूलच्या मुख्याध्यापिका सिमा कुलकर्णी,जिल्हा वकील संघाचे सचिव ॲड. विनोद कुलकर्णी,ग्रंथ संग्रहालय श्रीराम वाचनालयाचे सचिव श्रीकांत शेलगांवकर,योग शिक्षिका शिल्पा शेलगांवकर यांची उपस्थिती होती. मान्यवरांच्या हस्ते डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. यानंतर विवेक मांडे यांनी राग यमन व तुज मागतो मी आता हे सुंदर गीताचे बासरी वादन केले व त्यास अनंता पैठणकर यांनी तबल्यावर साथ सांगत देत सर्वांना मंत्र मुग्ध केले.

मार्गदर्शन करतांना मधुकर जोशी म्हणाले की, पहिले मनात निश्चित करा की आपल्याला काय बनायचे आहे त्यांदृष्टीने ग्रंथ व इतर साहित्य वाचनास सुरुवात करा. काहीही व्हायचे असेल तरीही वाचन करणे आवश्यक आहे. पुस्तकात वाचन करतांना अनेक प्रकारची रत्ने असतात ती आत्मसाद करा. स्पर्धा परीक्षेमध्ये येणारा अभ्यास हा ७० टक्के शालेय अभ्यासक्रमावर आधारित असतो. वाचन प्रेरणा दिनानिमित्ताने शपथ घ्या की कमीत कमी एक तास अभ्यासा व्यतिरिक्त वाचन करील. पुस्तकां सोबत विद्यार्थ्यांनी वर्तमान पत्रे देखिल वाचन करावी. पुस्तके वाचन करतांना *(पान २ वर)*

# अंबडचे युवा लेखक पुरुषोत्तम रेडे यांची ॲड. प्रकाश आंबेडकर व मंत्री संजय सावकारे यांच्याशी सदिच्छा भेट

**अंबड - प्रतिनिधी**



अंबड येथील युवा लेखक तथा सॉफ्टवेअर इंजिनिअर पुरुषोत्तम नामदेव रेडे यांनी मुंबई येथे वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर (बाळासाहेब) आणि राज्याचे मंत्री संजय सावकारे यांची सदिच्छा भेट घेऊन स्वलिखित 'तुमच्या श्रद्धेवर मला प्रश्न आहेत' हे पुस्तक भेट दिले.

या पुस्तकातून माणसाच्या विचारांवर होणारा सामाजिक संस्कारांचा प्रभाव, श्रद्धा-अंधश्रद्धेतील सीमारेषा, बुद्ध व अष्टावक्र यांचे तत्त्वज्ञान तसेच मानवतावाद, उदारमतवाद आणि अस्तित्वविषयक प्रश्नांचा वेध घेण्यात आला आहे. श्रद्धेपेक्षा विवेक, अनुकरणापेक्षा स्वतंत्र विचार आणि आंधळ्या स्वीकारापेक्षा प्रश्न विचारण्याची वृत्ती जोपासणे, हा पुस्तकाचा मुख्य संदेश आहे.समाजात विवेकवादी दृष्टिकोन रुजवणे आणि वैचारिक संवादाला चालना देणे, या उद्देशाने या भेटी घेतल्याचे रेडे यांनी सांगितले.







जालना शहरात विविध माता मंडळांनी नवरात्र महोत्सव निमित्त देवीची स्थापना करण्यात आली छायाचित्रे अनिल व्यवहारे १) श्री युवा संघ नवदुर्गा महोत्सव एस आर पी रोड जालना २) बलाराम नवरात्र महोत्सव महात्मा गांधी रोड जालना ३) मा वैष्णोदेवी नवरात्र महोत्सव पोस्ट ऑफिस रोड जालना ४) जय मा वैष्णोदेवी नवरात्र महोत्सव कडबी मंडी जालना ५) वीर शिरोमणी महाराणा प्रताप नवरात्र महोत्सव बस स्टँड रोड जालना सर्व छायाचित्रे अनिल व्यवहारे

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६**, E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.